# तेलंगणामध्ये ४१ नक्षलवाद्यांचे आत्मसमर्पण; शस्त्रे सुपूर्द

**हैदराबाद :** तेलंगणामधील कुख्यात ४१ नक्षलवाद्यांनी पोलीस महासंचालक शिवधर रेड्डी यांच्यापुढे आत्मसमर्पण केले. यात कामारेड्डी इथला राज्य समिती सचिव एर्रागोल्ला रवी उर्फ संतोष, मंचरियालचा कनिकारपू प्रभंजन, ओडिशा आणि छत्तीसगडमधील सहा विभागीय समिती सदस्य आणि दोन सेंट्रल व्हिजन कमांडर्स यांचा समावेश आहे. उर्वरित सर्व नक्षलवादी छत्तीसगडचे आहेत, अशी माहिती पोलीस महासंचालक शिवधर रेड्डी यांनी दिली. आत्मसमर्पणावेळी नक्षलवाद्यांनी २४ शस्त्रे पोलिसांच्या हवाली केली. या वर्षी आतापर्यंत ५०९ जहाल नक्षलवाद्यांनी आत्मसमर्पण केले आहे, अशी माहिती पोलीस महासंचालक रेड्डी यांनी दिली.




रायगड, नवी मुंबई

# राम प्रहर

◆ वर्ष १८ ◆ अंक १५३
www.ramprahar.com

◆ शनिवार, २० डिसेंबर २०२५ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹२


## अंतरंग


भारताची विश्वगुरू होण्याची क्षमता -मुख्यमंत्री फडणवीस/२

ब्युटी पेजंट स्पर्धेत झळकले सौंदर्यवतींचे ग्लॅमर/६

सिडको ओपन गोल्फ स्पर्धेत वीर अहलावत विजेता/८


गुटखा उत्पादकांवर 'मकोका' अंतर्गत होणार कारवाई

# प्रशासन लागले कामाला

## आमदार प्रशांत ठाकूर यांच्या मागणीची मुख्यमंत्र्यांकडून दखल

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

राज्यात गुटखा बंदी लागू असतानाही शाळा व महाविद्यालयांच्या परिसरात खुलेआम गुटखा विक्री होत असल्याचा गंभीर मुद्दा आमदार प्रशांत ठाकूर यांनी विधीमंडळाच्या हिवाळी अधिवेशनात उपस्थित केला होता. त्यांनी शासनाकडे कडक व प्रभावी उपाययोजना राबविण्याच्या केलेल्या मागणीची दखल राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी घेतली असून शासनाने तातडीने कार्यवाही सुरू केली आहे. त्यामुळे गुटखा उत्पादकांवर थेट मकोका कायद्यांतर्गत कारवाई होणार आहे.

राज्यात गुटखा बंदी असतानाही शाळा परिसर, महाविद्यालय परिसरांसह अनेक ठिकाणी गुटखा आढळून येतो. त्यामुळे गुटखा बंदी कायद्याची कडक अंमलबजावणी करण्यासाठी मकोका कायदा लागू करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. या मकोका लावण्यासाठीच्या प्रस्तावात आवश्यक त्या दुरूस्त्या कायद्यात करण्यात येणार आहेत. त्यानंतर येत्या नवीन वर्षात गुटखा उत्पादकांवर मकोका लागणार असल्याची माहिती अन्न व औषध प्रशासन व विशेष सहाय्यमंत्री नरहरी झिरवाळ यांनी दिली.



यापूर्वी गुटखा उत्पादक व विक्रेत्यांवर मकोका लावण्यासाठीचा प्रस्ताव विधी व न्याय विभागाकडे पाठवण्यात आला होता, मात्र कायद्यातील तरतुदींनुसार हार्म आणि हार्ट या दोन्ही घटकांअभावी तो लागू होत नाही. त्यामुळे या कायद्यात बदल करण्यात येऊन गुटखा व्यवसाय करणाऱ्यांवरही मकोका लागू करता येईल, अशा आवश्यक दुरूस्त्या कायद्यात करण्यात येऊन हा कायदा अधिक कठोर करण्यात येईल, अशी माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभेत दिली होती. त्यानुसार नागपूरचे हिवाळी अधिवेशन संपताच अन्न व औषध प्रशासन विभाग कामाला लागला आहे.

गुटखा उत्पादकांपर्यंत पोहचण्यासाठी विशेष धोरण आखले जाणार असून कायद्यातील त्रुटी दूर करण्यासाठी दुरूस्ती प्रस्ताव आणण्यात येणार असल्याचे मंत्री नरहरी झिरवाळ यांनी सांगितले. गुटखाबंदी कायदा कठोर करण्यासाठी व मकोका कायदा लावण्यासाठी त्यात आवश्यक ते बदल करून सुधारित प्रस्ताव विधी व न्याय विभागाकडे लवकरात लवकर पाठविण्याचे निर्देशही मंत्री झिरवाळ यांनी अधिकाऱ्यांना दिले.

राज्य सरकार गुटखा विक्री आणि नेटवर्क्सवर कडक कारवाई करण्यासाठी महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण कायदा अर्थात 'मकोका' लागू करण्याचा विचार केला आहे. त्यामुळे तस्करी करणाऱ्या, मोठ्या साखळ्या चालवणाऱ्या लोकांवर गंभीर गुन्हेगारी कायद्यांतर्गत कारवाई केली जाईल. या निर्णयामुळे शाळा व महाविद्यालय परिसर गुटखामुक्त होण्यास मोठी मदत होणार असून तरुण पिढीच्या आरोग्याच्या संरक्षणासाठी हा निर्णय अत्यंत महत्त्वाचा ठरणार आहे. याबद्दल नागरिकांकडून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, मंत्री नरहरी झिरवाळ, आमदार प्रशांत ठाकूर यांचे आभार व्यक्त होत आहेत.

# राज्यातील २४ नगर परिषदा, नगरपंचायतींसाठी आज मतदान

**मुंबई : प्रतिनिधी**

राज्यातील २४ नगर परिषदा आणि नगरपंचायती तसेच १५४ सदस्यपदांसाठी शनिवारी (दि. २०) मतदान प्रक्रिया होणार आहे. त्यासाठी निवडणूक यंत्रणा सज्ज झाली असून कर्मचारी मतदान केंद्रांवर रवाना झाले आहेत.



यवतमाळ, वाशीम, बारामती, अंबरनाथ, महाबळेश्वर, फलटण, कोपरगाव, देवळाली प्रवरा, पाथर्डी, नेवासा, फुरसुंगी-उरुळी देवाची, अनगर, मंगळवेढा, फुलंब्री, मुखेड, धर्माबाद, निलंगा, रेणापूर, बसमत, अनंजनगाव सूर्जी, बाळापूर, देऊळगावराजा, देवळी, घुग्घूस या नगर परिषदा आणि नगरपंचायतींसाठी हे मतदान होणार आहे. याशिवाय विविध जिल्ह्यातील ७६ नगर परिषदा आणि नगरपंचायतींमधल्या १५४ सदस्यपदांसाठीही मतदान होणार आहे.

निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांच्या निर्णयाविरुद्ध जिल्हा न्यायालयात अपील झालेल्या प्रकरणांमुळे २ डिसेंबरला होणारे मतदान राज्य निवडणूक आयोगाने २० डिसेंबपर्यंत पुढे ढकलले होते. या सर्व जागा तसेच २ डिसेंबरला मतदान झालेल्या ठिकाणांची एकत्रित मतमोजणी रविवारी होईल. त्यासाठीही तयारी सुरू आहे.

# पाण्याची टाकी कोसळून सहा जण ठार, नऊ जखमी

**नागपूर : प्रतिनिधी**

नागपूरच्या बुटीबोरी एमआयडीसीमधील अवाडा कंपनीत शुक्रवारी (दि. १९) पाण्याची टाकी कोसळून सहा कामगारांचा मृत्यू, तर नऊ जण गंभीर जखमी झाले आहेत. जखमींवर खाजगी रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार अवाडा कंपनीत सौर पॅनेलचे उत्पादन सुरू होते. बांधकाम कामगार पाण्याच्या टाकीशेजारी काम करीत असताना अचानक टाकी कोसळली आणि त्याखाली कामगार चिरडले गेले. या घटनेत सहा मजुरांचा मृत्यू झाला असून नऊ जण गंभीर जखमी आहेत. घटनेची माहिती मिळताच पोलीस व अग्निशमन पथक घटनास्थळी दाखल झाले. अपघाताचे नेमके कारण आणि सुरक्षिततेच्या उपाययोजनांतील त्रुटींचा तपास सुरू आहे.

## कोकाटे यांच्या अटकेला स्थगिती

**मुंबई : प्रतिनिधी**

सदनिका घोटाळाप्रकरणी दोन वर्षांच्या सक्तमजुरीची शिक्षा सुनावण्यात आलेले राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते आणि आमदार माणिकराव कोकाटे यांना नाशिक सत्र न्यायालयाने सुनावलेल्या शिक्षेला शुक्रवारी (दि. १९) मुंबई उच्च न्यायालयाने स्थगिती दिली.


कोर्टाने एक लाख रुपयांच्या जामिनावर कोकाटे यांची सुटका केली आहे. त्यामुळे त्यांच्यावरील अटकेची कारवाई टळली आहे.

# बेटिंग ॲपप्रकरणी क्रिकेटपटू, कलाकारांची मालमत्ता जप्त

## ■ ईडीची कारवाई; नामांकित सेलिब्रिटींचा समावेश

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

ऑनलाइन बेटिंग ॲप १एक्स बेटशी संबंधित मनी लॉण्डरिंग प्रकरणात सक्तवसुली संचालनालयाने (ईडी) मोठी कारवाई केली. या कारवाईत भारतीय क्रिकेट संघाचे माजी दिग्गज खेळाडू युवराज सिंग आणि रॉबिन उथप्पा यांच्यासह अनेक नामांकित बॉलीवूड सेलिब्रिटींच्या कोट्यवधी रुपयांच्या मालमत्तेवर जप्ती आणली आहे.



ईडीने शुक्रवारी (दि. १९) केलेल्या कारवाईत एकूण ७.९३ कोटी रुपयांची मालमत्ता जप्त केली आहे. यामध्ये युवराज सिंग (२.५ कोटी) आणि रॉबिन उथप्पा (८.२६ लाख) या क्रिकेटपटूंसोबतच चित्रपटसृष्टीतील उर्वशी रौतेला (२.०२ कोटी, मालमत्ता आईच्या नावावर नोंदणीकृत), सोनू सूद (१ कोटी), मिमी चक्रवर्ती (५९ लाख), अंकुश हजारा (४७.२० लाख) आणि नेहा शर्मा (१.२६ कोटी) यांची मालमत्ता जप्त करण्यात आली. या कारवाईमुळे क्रीडा आणि मनोरंजनविश्वात मोठी खळबळ उडाली आहे.

### नेमके प्रकरण काय?

१एक्स बेट हे एक विदेशी ऑनलाइन सट्टेबाजीचे ॲप आहे, ज्याला भारतात अधिकृत परवानगी नाही, मात्र अनेक सेलिब्रिटींनी या ॲपच्या जाहिराती आणि प्रमोशनमध्ये सहभाग घेतला. या प्रमोशनच्या बदल्यात मिळालेले मानधन आणि त्यातून झालेली आर्थिक उलाढाल ही मनी लॉण्डरिंगच्या कक्षेत येत असल्याचे ईडीचे म्हणणे आहे. या सेलिब्रिटींनी बेकायदेशीर ऑनलाइन बेटिंगला प्रोत्साहन दिल्याचा आणि त्यातून आर्थिक फायदा मिळवल्याचा ठपका ठेवत ही जप्तीची कारवाई करण्यात आली आहे. याआधी ईडीने शिखर धवन आणि सुरेश रैना यांचीही मालमत्ता जप्त केली. या संपूर्ण प्रकरणात ईडीने आतापर्यंत एकूण १९.०७ कोटी रुपयांच्या मालमत्तेवर टाच आणली आहे.

## निवडक

### संसदेचे हिवाळी अधिवेशन संस्थगित; 'राम-जी' विधेयकाला मंजुरी

**नवी दिल्ली :** संसदेच्या दोन्ही सभागृहांचे कामकाज शुक्रवारी (दि. १९) अनिश्चित काळासाठी तहकूब झाले. लोकसभेत सभापती ओम बिर्ला यांनी सांगितले की, १ डिसेंबरपासून सुरू झालेल्या या हिवाळी अधिवेशनात सभागृहाच्या १५ बैठका झाल्या आणि त्यात १११ टक्के विधायक कामकाज झाले. राज्यसभेत ९२ तास कामकाज झाले असून १२१ टक्के उत्पादकता राहिली, अशी माहिती उपराष्ट्रपती सी.पी. राधाकृष्णन यांनी दिली. दरम्यान, लोकसभेत मंजूर विकसित भारत ग्रामीण रोजगार हमी आणि उपजीविका अभियान अर्थात विकसित भारत-जी राम-जी विधेयकाला राज्यसभेचीही मंजुरी मिळाली.

### नाताळ आणि नवीन वर्षाच्या स्वागतासाठी अतिरिक्त रेल्वेगाड्या

**मुंबई :** आगामी नाताळ आणि नवीन वर्षाच्या काळात होणारी प्रवाशांची वाढती गर्दी लक्षात घेऊन देशातील नऊ विभागात १३८ विशेष रेल्वेगाड्या चालवण्याचा निर्णय भारतीय रेल्वेने घेतला आहे. या गाड्यांच्या एकंदर ६५० फेऱ्या होणार असून यातील २४४ फेऱ्यांबाबतची सूचना जारी करण्यात आली आहे. नाताळ आणि नववर्ष प्रवाशांना विनासायास साजरे करता यावे यासाठी या विशेष गाड्यांद्वारे अतिरिक्त क्षमता, सुविधा आणि सेवा पुरवण्याचा रेल्वे विभागाचा प्रयत्न आहे.

# परदेश दौऱ्याचे आमिष दाखवून माथेरानमध्ये पर्यटकांची फसवणूक

## ३२ लाख उकळले, त्रिकुटाविरोधात गुन्हा

**नेरळ : प्रतिनिधी**

प्रसिद्ध पर्यटनस्थळ असलेल्या माथेरानमध्ये फिरण्यासाठी आलेल्या पर्यटकांना परदेश पर्यटनाचे आमिष दाखवून तब्बल ३२ लाख २४ हजार ९९८ रुपयांची फसवणूक केल्याचे समोर आले आहे. या प्रकरणी माथेरान पोलीस ठाण्यात तीन आरोपींविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मुंबईतील मुलुंड येथे राहणारे फिर्यादी गृहस्थ पत्नीसह मे महिन्यात माथेरान येथे पर्यटनासाठी आले होते. तीन आरोपींनी वर्ल्ड इनलेस व्हॅकेशन नावाच्या कंपनीचे स्क्रॅच कार्ड देत तुम्ही विजेते आहात असे सांगून संपर्क साधला. यानंतर आरोपींनी फिर्यादीस परदेश पर्यटनाचे आकर्षक पॅकेज देण्याचे आमिष दाखवले. या प्रलोभनाला बळी पडलेल्या फिर्यादीकडून त्रिकूटाने आयसीआयसीआय बँकेच्या क्रेडिट कार्डमधून दोन लाख ४० हजार रुपये घेतले.

इतकेच नव्हे, तर आरोपींनी इतर पर्यटकांकडूनही फोनपे, गुगल पे, नेट बँकिंग व यूपीआयद्वारे पैसे उकळून स्वतःच्या आर्थिक फायद्यासाठी एकूण ३२ लाख २४ हजार ९९८ रुपयांची रक्कम लंपास केली, असे तपासात निष्पन्न झाले आहे. या प्रकरणी माथेरान पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या गुन्ह्याचा अधिक तपास सहाय्यक निरीक्षक अनिल सोनोने करीत आहेत.

### नावलौकिकाला धोका

*पर्यटकांना आकर्षित करून अशा प्रकारे आर्थिक फसवणूक होणे माथेरानसारख्या संवेदनशील पर्यटनस्थळाच्या प्रतिमेला मोठा धक्का देणारे आहे. वेळीच कठोर कारवाई झाली नाही, तर अशा टोळ्यांमुळे पर्यटकांचा माथेरानकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलण्याची भीती व्यक्त केली जात आहे, तर पर्यटकांनीही अशा स्क्रॅच कार्ड, मोफत पॅकेज, परदेश दौऱ्याच्या आमिषाला बळी न पडण्याचे आवाहन पोलिसांकडून करण्यात येत आहे.*





**पनवेल :** सामाजिक क्षेत्रात अग्रेसर असलेल्या खारघर येथील संकल्प प्रतिष्ठानच्या सन २०२६च्या दिनदर्शिकेचे प्रकाशन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते शुक्रवारी करण्यात आले. या उपक्रमाबद्दल आमदार प्रशांत ठाकूर आणि भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी यांनी संकल्प प्रतिष्ठानच्या कार्याचे कौतुक करीत पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. प्रकाशन सोहळ्यास संकल्प प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष तथा भाजप एनजीओ सेलचे संयोजक मामा मांजरेकर, सचिव तथा भाजप प्रभाग ५चे अध्यक्ष अजय माळी, खारघर शहर सरचिटणीस दीपक शिंदे, महिला मोर्चा अध्यक्ष साधना पवार, उपाध्यक्ष अश्विनी भुवड, उत्तर भारतीय मोर्चाचे जिल्हाध्यक्ष संतोष शर्मा, अशोक पवार, संजय मुळीक आदी उपस्थित होते.

# सातपुड्यात हाडे गोठवणारी थंडी

**नंदुरबार : प्रतिनिधी**

नंदुरबार जिल्ह्यातील सातपुडा पर्वतरांगांमध्ये गेल्या दोन दिवसांपासून तापमानात मोठी घसरण झाली असून कडाक्याच्या थंडीने जनजीवन विस्कळीत झाले आहे. विशेषतः सातपुड्यातील अतिदुर्गम व डोंगराळ भागांमध्ये तापमान इतके खाली घसरले आहे की, दवबिंदू गोठल्याचे चित्र पहायला मिळत आहे.



भाताच्या पेंढ्यावर जमली बर्फाची चादर

मोलगी परिसरातील डाब आणि वालंबा या भागांमध्ये गेल्या दोन दिवसांपासून कडाक्याची थंडी जाणवत आहे. सकाळी भाताच्या पेंढ्यावर साचलेले दवबिंदू पूर्णपणे गोठल्याचे दिसून आले. भाताच्या हिरव्या पेंढ्यावर पसरलेली हे गोठलेल्या दवबिंदूंचे थर जणू काही बर्फाची पातळ चादर पसरल्याचा भास निर्माण करत होते.

सातपुड्यासारख्या भागात सहसा बर्फवृष्टी होत नसली तरी या दृश्याने नागरिकांनाही आश्चर्याचा धक्का दिला आहे. तापमानातील या तीव्र घसरणीचा सर्वाधिक परिणाम आदिवासी आणि ग्रामीण भागांमध्ये जाणवत आहे. पहाटे आणि रात्रीच्या वेळी थंडीचा जोर अधिक वाढत असल्याने नागरिकांना घराबाहेर पडणे कठीण होत आहे.

थंडीपासून बचाव करण्यासाठी गावागावांत शेकोट्या पेटवलेल्या दिसून येत असून लहान मुले, वृद्ध आणि महिलांना विशेष काळजी घ्यावी लागत आहे. काही दिवस थंडीचा जोर कायम राहण्याची शक्यता आहे.

अनेक ठिकाणी शेतकरी सकाळी लवकर शेतात जाणे टाळत असून जनावरेही थंडीमुळे कुडकुडताना दिसत आहेत. काही भागांत पिकांवर दव गोठल्याने भाजीपाला आणि चाऱ्याच्या पिकांना नुकसान होण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

# भाईंदरमध्ये बिबट्याचा धुमाकूळ; सात जण जखमी

**भाईंदर : प्रतिनिधी**

भाईंदर पूर्वेकडील तलाव रोड परिसरातील पारिजात निवासी इमारतीमध्ये शिरलेल्या बिबट्याने शुक्रवारी (दि.१९) सकाळपासून स्थानिकांमध्ये प्रचंड घबराट निर्माण केली. तब्बल सात तास चाललेल्या रेस्क्यू ऑपरेशननंतर वन विभाग आणि मीरा-भाईंदर महापालिकेच्या अग्निशमन दलाच्या जवानांना या बिबट्याला जेरबंद करण्यात अखेर यश आले आहे. बिबट्याच्या हल्ल्यात सात जण जखमी झाल्याची प्राथमिक माहिती आहे.





अखेर जेरबंद

मिळालेल्या माहितीनुसार शुक्रवारी सकाळी ८ वाजण्याच्या सुमारास तलाव रोड परिसरातील पारिजात इमारतीजवळ बिबट्या वावरत असल्याचे स्थानिकांच्या निदर्शनास आले. बिबट्याला पाहताच नागरिकांमध्ये एकच घबराट पसरली. याची माहिती मिळताच मीरा-भाईंदर महापालिकेचे अग्निशमन दलाचे जवान तत्काळ घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी वनविभागाला पाचारण केले.

सात तासांच्या प्रयत्नांनंतर अखेर दुपारी बेशुद्ध करणाऱ्या इंजेक्शनचा वापर करून बिबट्याला सुरक्षितपणे जेरबंद करण्यात आले. हा बिबट्या संजय गांधी राष्ट्रीय उद्यानातून या परिसरात आला असावा, असा अंदाज व्यक्त करण्यात येत आहे.

### अलिबागमध्ये पुन्हा दर्शन

**अलिबाग :** बिबट्याची दहशत अलिबाग तालुक्यात कायम असून शुक्रवारी (दि. १९) पहाटे अलिबाग-कार्लेखिंड मार्गावर राऊतवाडी येथे काही कारमधून जाणाऱ्या प्रवासी नागरिकांना बिबट्या दिसल्याचे सांगितले जात आहे. याआधी अलिबागच्या नागावमध्ये, त्यानंतर शेजारील आक्षी साखर येथेसुद्धा बिबट्या वावरताना दिसला होता. त्याने जवळपास आठ जणांना जखमी केले. गुंगारा देऊन बिबट्या परिसरात फिरत असल्याने लोकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. दरम्यान, वनविभागाकडून बिबट्याचा शोध सुरू आहे.

# प्राचीन ज्ञान-परंपरेची आधुनिक तंत्रज्ञानाशी सांगड घालत भारताची विश्वगुरू होण्याची क्षमता -मुख्यमंत्री

**मुंबई : प्रतिनिधी**

प्राचीन भारत हा जगातील सर्वाधिक प्रगत आणि आर्थिक महासत्ता असणारा देश होता. भारतातील ज्ञान, परंपरा आणि संस्कृतीमुळे देश जगात आघाडीवर होता. या प्राचीन ज्ञानाचीआजच्या आधुनिक तंत्रज्ञानाशी प्रभावी सांगड घातल्यास भारत पुन्हा एकदा 'विश्वगुरू' होऊ शकतो, असाविश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला. वांद्रे-कुर्ला संकुलातील ग्रँड हयात येथे वर्ल्ड इकॉनॉमिक फोरमच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते.




यावेळी व्यासपीठावर के पी ग्लोबलचे अध्यक्ष राजेश शर्मा, वर्ल्ड इकॉनॉमिक फोरमचे संस्थापकअध्यक्ष स्वामी विद्यानंद, जे एस डब्ल्यू ग्रूपचे अध्यक्ष सज्जन जिंदाल आयटी मंत्राचे मुख्य कार्यकारीअधिकारी आणि व्यवस्थापकीय संचालक शैलेश त्रिवेदी उपस्थित होते.

'इनव्हेशन, सेल्फ रिलायन्स अँड प्रोस्पेरिटी' (शोध, स्वावलंबन आणि समृद्धी) या देशाच्या विकास दिशा ठरविणाऱ्या संकल्पनेवर या मंचावर मंथन होत असल्याचे सांगून मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, हिंदू ही केवळ धर्मव्यवस्था नसून जीवनपद्धती व विचारप्रणाली आहे. हजारो वर्षांपासून ही परंपरा जिवंत आहे. अनेक प्राचीन संस्कृती लुप्त झाल्या; मात्र सिंधू-हिंदू संस्कृती आजही टिकून आहे. पुराव्यांवर सिद्ध झालेले हे सांस्कृतिक सातत्य दहा हजार वर्षांपूर्वीपासून अस्तित्वात असल्याचे दर्शवते.

भारत हा नवनिर्मितीचा मूळ स्रोत आहे. खगोलशास्त्र व भूगोलासारखी शास्त्रे प्राचीन काळात भारतात अत्यंत प्रगतहोती. वेद आणि वेदपूर्व साहित्यामध्ये त्याची साक्ष आढळते. जगात आता पाचवी औद्योगिक क्रांती सुरूअसून ही क्रांती डिजिटायजेशनमुळे होत आहे. तसेच एआय आणि डाटा या क्षेत्राला या क्रांतीमध्ये अनन्यसाधारण महत्व आहे. यासाठी लागणारे उत्पादन महत्वाचे आहे. उत्पादन क्षेत्र हे अर्थव्यवस्थेचे कणाआहे. इनोव्हेशनचे मूळ उत्पादनातच आहे आणि या क्रांतीचे नेतृत्व करण्याची क्षमता भारताकडे आहे.

कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) आणि डेटा क्षेत्रात भारत आघाडीवर असून २०३० पर्यंत जगातीलसर्वाधिक डेव्हलपर्स भारतीय असतील, असे मायक्रोसॉफ्टचे प्रमुख सत्य नाडेला यांनीही नमूद केल्याचेमुख्यमंत्र्यांनी यावेळी सांगितले. एआयमुळे उद्योगांमध्ये आमूलाग्र बदल होत असून या इनोव्हेशनमध्येनेतृत्व करण्याची क्षमता भारतात आहे.'आत्मनिर्भर भारत' या प्रधानमंत्री नरेंद्र मोदींच्या संकल्पनेचा उल्लेख करत मुख्यमंत्री म्हणाले की,१४० कोटी लोकसंख्येचा देश आत्मनिर्भर बनणे अत्यावश्यक आहे. स्वदेशी म्हणजे देशातच उत्पादन.

भारतीय कंपन्यांमार्फत तंत्रज्ञानाचा विकास करण्यात येत आहे. चीनने जपानचे तंत्रज्ञान वापरले, त्याचेरिव्हर्स इंजिनिअरिंग केले. पण भारतात तंत्रज्ञान समजून घेऊन आत्मनिर्भर होण्याची क्षमता आहे.तंत्रज्ञानाला आज असलेले महत्व ओळखून प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी अनेक क्षेत्रात तंत्रज्ञान हस्तांतरणाचीअट घातली आहे भारताच्या नेतृत्वावर आणि संस्कृतीवर जागतिक विश्वास वाढत आहे. आफ्रिकेमध्ये विकासाच्या नव्या संधी असून, त्या संधींमध्ये जो देश सक्रिय सहभाग घेईल तोच जागतिक नेतृत्व करेल. भारत आणिआफ्रिकी देशांमधील संबंध दृढ असून अनेक आफ्रिकी देश प्रधानमंत्री नरेंद्र मोदींना आपला नेता मानतात.

## चवदार तळे, मागासवर्गीय वसतीगृहाच्या मुद्द्यावर ना. आठवले सकारात्मक



### धैर्यशील पाटील, सतीश धारप यांनी घेतली भेट

**अलिबाग : प्रतिनिधी**

राज्यसभा खासदार तथा भाजपाचे रायगड जिल्हाध्यक्ष धैर्यशील पाटील आणि भाजपचे जिल्हा महामंत्री सतीश धारप यांनी केंद्रीय सामाजिक न्याय व सक्षमीकरण राज्यमंत्री रामदास आठवले यांची त्यांच्या दिल्ली येथील निवासस्थानी भेट घेतली. महाडमधील ऐतिहासिक चवदार तळ्याच्या परिसराचा सर्वांगीण विकास करण्याच्या हेतूने चवदार तळे प्राधिकरण निर्माण करण्याच्या हेतूने झालेल्या भेटीत यावर सविस्तर चर्चा करण्यात आली.

रामदास आठवले यांनी याबाबत सकारात्मक प्रतिसाद देत तात्काळ प्रशासनास मुख्यमंत्री महोदयांना निर्देशीत करण्याबाबत सूचना दिल्या. मुंबई भेटीदरम्यान याबाबत बैठक सुद्धा लावण्याचे आश्वासन त्यांनी यावेळी दिले. त्याचबरोबर नवीन नवी मुंबई विमानतळ यामुळे निर्माण होणाऱ्या किमान एक लाख रोजगाराची संधी ही शक्यता लक्षात घेता रायगड जिल्ह्यातील उलवे खारघर कामोठे परिसरात अंदाजे २ हजार निवासी क्षमतेचे वसतिगृह निर्माण करण्याची आवश्यकता असल्याची आग्रही मागणी सुद्धा खासदार पाटील यांनी केली.

## पनवेल महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर सर्वपक्षीय सदस्यांची बैठक

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महानगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार आदर्श आचारसंहितेची प्रभावी अंमलबजावणी करण्यात येत आहे. या अनुषंगाने निवडणूक प्रक्रिया पारदर्शक, निष्पक्ष व शांततेत पार पडावी यासाठी सर्व पक्षीय सदस्याची बैठक आज दिनांक १९ डिसेंबर रोजी नाट्यगृहात घेण्यात आली. निवडणूक अधिकारी तथा आयुक्त मंगेश चितळे यांच्या प्रमुख उपस्थितीत घेण्यात आलेल्या या बैठकित सर्व निवडणुक निर्णय अधिकारी, महापालिका उपायुक्त, सर्व पक्षीय प्रतिनिधी उपस्थित होते.




निवडणूक कार्यक्रमानुसार पारंपरिक पद्धतीने (ऑफलाइन) नामनिर्देशन अर्जा सोबत आवश्यक कागदपत्रांची पूर्तता, शपथ पत्र, जोड प्रमाणपत्र व त्याबरोबर प्रक्रिया, छाननी, उमेदवारी मागे घेणे, मतदान व मतमोजणी याबरोबरच आदर्श आचारसंहितेची अमंलबजावणी याची माहिती अतिरीक्त आयुक्त महेश मेहमाळे यांनी उपस्थितांना सांगितली.

राजकीय पक्ष व उमेदवारांसाठी सभा, मिरवणुका, प्रचार साहित्य, सोशल मीडिया व इलेक्ट्रॉनिक माध्यमांवरील प्रचारासाठी स्वतंत्र नियम लागू असून, प्रत्येक प्रचारासाठी पूर्वपरवानगी घेणे बंधनकारक आहे. मतदानाच्या दिवशी वाहन वापर, मतदान केंद्रांवरील प्रवेश, प्रचार साहित्य वापर यासंबंधीही स्पष्ट मार्गदर्शक सूचना यावेळी सांगण्यात आल्या. याचबरोबर उमेदवारांच्या आर्थिक जमा, खर्च याबाबतची मुख्य लेखा व वित्त अधिकारी मंगेश गावडे यांनी माहिती दिली. उमेदवाराला प्राप्त निधी ,देणगी, उमेदवाराने केलेल्या खर्चाचा तपशील, प्रत्येक उमेदवाराने निवडणूक खर्चाची स्वतंत्र नोंद ठेवणे आवश्यक असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.

माध्यमांवरील प्रचारावर नियंत्रण ठेवण्यासाठी मीडिया सर्टिफिकेशन अँड मॉनिटरिंग कमिटी स्थापन केली आहे

## महिलांसोबत कामाच्या ठिकाणी होणाऱ्या लैंगिक छळाबाबत कर्मचाऱ्यांमध्ये जागरूकता कार्यक्रम

**नवी मुंबई : सिडको वृत्तसेवा**

महिलांसोबत कामाच्या ठिकाणी होणारा लैंगिक छळ (प्रतिबंध, मनाई व तक्रार निवारण) अधिनियम, २०१३अर्थात पॉश कायदा याविषयी सिडकोतर्फे सर्व कर्मचाऱ्यांसाठी १९ डिसेंबर २०२५ रोजी जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.



हा कार्यक्रम सिडकोच्या विशाखा समितीमार्फत राबविण्यात आला.कार्यस्थळी सुरक्षित,सन्मानजनक व सर्वसमावेशक वातावरण निर्माण करण्याच्या उद्देशाने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.या कार्यक्रमाला सहव्यवस्थापकीय संचालक शान्तनु गोयल, सहव्यवस्थापकीय संचालक गणेश देखमुख तसेच मुख्य दक्षता अधिकारी सुरेश मेंगडे उपस्थित होते. यावेळी विशाखा समितीच्या अध्यक्षा श्रीमती.गीता पिल्लई तसेच समितीचे सदस्यही उपस्थित होते. त्याचप्रमाणे सिडकोचे विभागप्रमुख, अधिकारी वकर्मचारी देखील मोठ्या संख्येने उपस्थित होते.

अनुसूया महिला संघटनेच्या अध्यक्षा श्रीमती. नीलम पालव यांनी या कायद्याच्या विविध तरतुदींची सविस्तर माहिती दिली. लैंगिक छळाची व्याख्या, प्रतिबंधात्मक उपाययोजना, नियोक्ता व कर्मचाऱ्यांची जबाबदारी, तसेच कायद्याअंतर्गत उपलब्ध असलेली तक्रार निवारण प्रक्रिया याबाबत त्यांनी मार्गदर्शन केले. अंतर्गत तक्रार समितीची भूमिका, तक्रार दाखल करण्याची प्रक्रिया व गोपनीयतेचे महत्त्व यावरही त्यांनी विशेष भर दिला.

कर्मचाऱ्यांनी ही प्रश्न विचारून सक्रिय सहभाग नोंदविला. यामुळे विषयावर सखोल, सकारात्मक व उपयुक्त चर्चा घडून आली आणि कर्मचाऱ्यांचे सदर कायद्याविषयीचे ज्ञान अधिक दृढ झाले.या जनजागृती उपक्रमाच्या माध्यमातून सिडकोने महिलांसोबत कामाच्या ठिकाणी होणारा लैंगिक छळअधिनियम, २०१३ कायद्याची प्रभावी अंमलबजावणी करण्याची तसेचसर्व कर्मचाऱ्यांसाठी सुरक्षित, सन्मानजनक व छळमुक्त कार्यस्थळ सुनिश्चित करण्याची आपली बांधिलकी पुन्हा अधोरेखित केली.

## कुलदैवतांचा तळी भंडार सोहळा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

कुलदैवतांचा तळी भंडार सोहळ्याचे आयोजन कामोठे येथे २१ डिसेंबर रोजी सकाळी १०:३० वाजता साई मिरॅकल सोसायटी हॉल येथे आयोजित करण्यात आले आहे. भाविकानी या कार्यक्रमास उपस्थित राहावे असे आवाहन श्री क्षेत्र पिंपळगाव रोठा गावाचे उपसरपंच महादेव पुंडे, मुंबईकर ग्रामस्थ पदाधिकारी, श्री खंडोबा देवस्थान, शिवमल्हार सेवाभावी संस्था, भाविक भक्त व ग्रामस्थ, पिंपळगाव रोठा, पंचक्रोशी, मुंबईकर व पुणेकर मंडळी यांनी केले आहे.

महाराष्ट्र राज्याचे कुलदैवत आणि प्रती जेजुरी म्हणून नावारूपास आलेले महाराष्ट्र शासनाचे ब' वर्ग तिर्थक्षेत्र श्री क्षेत्र कोरठणगड पंचक्रोशीतील सर्व भाविक भक्त आणि मुंबईकर ग्रामस्थांच्या यांच्या संयुक्त विद्यमाने कुलदैवत श्रीक्षेत्र कोरठण खंडोबा देवाचा वार्षिक यात्रा महोत्सव ३ जानेवारी ते ५ जानेवारी २६ रोजी संपन्न होत आहे. या यात्रेनिमित्त कुलदैवताचा पारंपरिक तळी-भंडार सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. पालखी सोहळा भक्तीमय, शिस्तबद्ध व निर्विघ्न पार पडावा यासाठी कुलदैवताचा तळी-भंडार सोहळा २१ डिसेंबर रोजी साई मिरॅकल सोसायटी हॉल, कामोठे येथे आयोजित करण्यात आला असून महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे.

यावेळी वरीष्ठ पोलीस निरीक्षक कामोठे विमल बिडवे, महानगर बँक अध्यक्षा गीतांजली शेळके, पारनेर तालुक्याचे श्री खंडोबा देवस्थान माजी अध्यक्ष अँड पांडुरंग गायकवाड, सामान्य प्रशासन उपसचिव (महाराष्ट्र) सुदाम आंधळे, मनसेचे योगेश चिले, हॅप्पी सिंग, हरेश्वर शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष रामदास शिंदे, महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे वाहतूक संघटक शिवाजी सुपेकर, माजी नगरसेवक विकास घरत, प्रदीप भगत, अँड समाधान काशीद (वकील उच्च न्यायालय), किसनराव पावडे, सुवर्णा वाळुंज, गणपत वाफारे, चंद्रभान चिकणे, किरण शेलार, उपस्थित राहणार आहेत.

## कामोठ्यातील दि.बा. पाटील विद्यालय येथे वार्षिक क्रीडा महोत्सव

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गुणवत्तेसोबतच क्रीडा कौशल्य वाव देण्याच्या उद्देशाने रयत शिक्षण संस्थेचे लोकनेते दि.बा.पाटील विद्यालय कामोठे येथे गुरुवार दिनांक १८ ते शनिवार दिनांक २० डिसेंबर या कालावधीत वार्षिक क्रीडा मोर्चाचे आयोजन केले आहे.



या वार्षिक क्रीडा महोत्सवाच्या उद्घाटन प्रसंगी विद्यालयाचे व्हाइंस चेअरमन विनायक म्हात्रे, माजी चेअरमन स्वामी म्हात्रे, बाळाराम चिपळेकर, नारायण पोपटा, संतोष भगत, संतोष गोवारी,अनिल पाटील, आदी स्थानिक सल्लागार समितीचे सर्व पदाधिकारी, माजी विद्यार्थी संघाचे अध्यक्ष भगवान गोवारी, विशाल पावणेकर, योगेश परदेशी शैलेश गोवारी, घनश्याम म्हात्रे आदी पदाधिकारी उपस्थित होते.

या क्रीडा महोत्सवात पाचवी ते दहावीच्या विद्यार्थ्यांसाठी कबड्डी, खो-खो ,धावणे गोळा फेक , बुद्धिबळ, कॅरम इत्यादी स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे. उद्घाटन कार्यक्रमाच्या प्रसंगी माजी विद्यार्थी संघाचे अध्यक्ष यांनी विद्यार्थ्यांसाठी खाऊ दिला. विद्यालयाचे मुख्याध्यापक तथा रायगड विभागाचे विभागीय अधिकारी एम.के. कोंगेरे यांनी विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासाच्या दृष्टीने क्रीडाचे महत्व सांगितले. तसेच माजी विद्यार्थ्यांनी विद्यालयातील विद्यार्थ्यांना खाऊ दिल्याबद्दल त्यांचे आभार मानले. या क्रीडा स्पर्धेचे आयोजन क्रीडा प्रमुख सहाणे, गलांडे यांनी केले.

## ऐरोलीत ठाकरे गटाला भाजपचा दे धक्का!


**नवी मुंबई : बातमीदार**

ऐरोली पॅनल क्रमांक - ४ मध्ये सक्रियपणे कार्यरत असणारे उबाठा गटाचे उपशहर प्रमुख विजय चव्हाण यांच्यासह इतर पदाधिकारी, कार्यकर्ते व त्यांच्या असंख्य समर्थकांनी शुक्रवारी व्हाईट हाऊसमध्ये भारतीय जनता पक्षात जाहीर प्रवेश केला. माजी खा. संजीव नाईक, माजी महापौर सागर नाईक यांनी त्यांचे पक्षात स्वागत केले.

प्रभाग क्र. ४ मधून नुकतेच एम के मढवी कुटुंबीयांनी ठाकरे गटाला रामराम करत शिंदे सेनेत प्रवेश केला. त्यामुळे कार्यकर्ते नाराज होते. त्यामुळे विजय चव्हाण यांनी त्यांच्या कार्यकर्त्यांसह भाजपची वाट धरली. चव्हाण यांच्या प्रदीर्घ अनुभवामुळे आणि जनसंपर्कामुळे विभाग क्रमांक - ४ मध्ये पक्ष संघटन अधिक मजबूत होईल आणि पक्षाची ताकद निश्चितपणे वाढेल असा विश्वास संजीव नाईक यांनी व्यक्त केला.



## जिल्हा विज्ञान प्रदर्शनासाठी कर्जत तालुक्यातून १२ प्रतिकृतींची निवड




**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत तालुका विज्ञान प्रदर्शनात मांडण्यात आलेल्या १८९ प्रतिकृतींमधून रायगड जिल्ह्याच्या विज्ञान प्रदर्शनासाठी १२ प्रतिकृतींची निवड करण्यात आली आहे. यावर्षी ५३ व्या कर्जत तालुका विज्ञान प्रदर्शनात विक्रमी प्रतिकृती मांडण्यात आल्या होत्या. तालुका विज्ञान प्रदर्शनाचा समारोप जिल्हा परिषदेच्या प्राथमिक विभागाच्या शिक्षणाधिकारी ललिता दहीफुले यांच्या उपस्थितीत झाला.

कर्जत तालुका स्तरीय ५३ वे विज्ञान प्रदर्शन नेरळ येथील शार्विल स्कुल ऑफ एक्ससन्स मध्ये झाले. विज्ञान प्रदर्शनाच्या समारोप प्रसंगी प्राथमिक विभागाच्या शिक्षणाधिकारी ललिता दहीफुले यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधताना 'नोकरी मिळाली नाही तरी नैराश्य जाणारे विद्यार्थी आपल्याला घडवायचे आहेत. आपल्याला विद्यार्थी घडवताना नोकऱ्या देणारे विद्यार्थी घडवायचे आहेत. आताची पिढी प्रचंड ज्ञान आत्मसात करणारी असल्याने त्यांना ज्ञान घेताना मोकळे सोडा अन्यथा शिक्षक वर्गासाठी येणारा काळ कठीण आहे. असा सल्ला जिल्हा शिक्षक अधिकाऱ्यांनी शिक्षकांना दिला.आपल्या विद्यार्थ्यांना आणि पिढीला चांगले काय आणि वाईट काय? एवढेच शिकवायचे असून त्यातून चांगले ज्ञान घेण्यासाठी ते तयार आहेत. मोबाईलचा वापर हा आपल्याला ज्ञान घेण्यासाठी करावा. समाजात उत्तम नागरिक घडवा.' असे आवाहन केले.

## टँकरच्या धडकेत तरुणाचा मृत्यू

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

रसायनी पोलीस ठाणे हद्दीत सुनिल कुमार मांझी (वय २९ वर्षे) व सोबत कामगार विनीत कुमार हे बोरिवली येथील मित्सू केम प्लास्ट लिमीटेड कंपनीतील काम संपल्यावर कंपनीचे गेटवरून तळवली वे वाशिवली असे जाणारे रोडने पायी चालत वाशिवली गावात घर सामान आणणेकरीता जात असतांना सायंकाळी साडेसात वाजण्याच्या सुमारास एक सफेद-निळ्या रंगाचा टँकरने भरधाव वेगात सुनिल कुमार मांझी (वय २९ वर्षे) यास मागील बाजुने ठोकर दिले. या अपघातामध्ये सुनील गंभीर जखमी होऊन त्याचा मृत्यू झाला.

## बौद्ध तरुणांनी एकसंघ राहून समाजाच्या विकासासाठी झटले पाहिजे -ॲड चोरपगार




**पनवेल : रामप्रहर वृत्त**

'सद्य परिस्थिती पाहता, आपल्या बौध्द समाजाच्या जनतेने विशेषतः बौध्द तरुणांनी एकसंघ राहून संघटितपणे आपल्या समाजाच्या विकासासाठी झटले पाहिजे, नव्हे तर ती काळाची गरज आहे.' असे प्रतिपादन व्याख्याते ॲड. अनुप चोरपगार यांनी केले.


नवीन पनवेल, सेक्टर ९. येथील ॲड. प्रकाश बिनेदार आम्रपाली बुध्द विहारात माजी नगरसेवक तथा संस्थापक-अध्यक्ष ॲड. प्रकाश बिनेदार यांच्या मार्गदर्शनाखाली बुध्दगया प्रतिष्ठान आणि भारतीय बौध्द महासभा, विभाग क्र. १४, नवीन पनवेल. यांच्यावतीने प्रत्येक गुरुवारी आयोजित करण्यात येणार्या धम्म प्रवचन आणि सामाजिक बांधिलकी या विषयावरील मालिकेचे २३वे पुष्प गुंफतांना बोलत होते.

यावेळी त्यांनी, आपल्या समाजात राजकीय क्षेत्रात वैचारीक मतभिन्नता असली तरी आजच्या तरुणांनी तथागतांची धम्म तत्वे आणि विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे मौलिक विचार घेऊन समाजात कार्यरत राहिल्यास सामाजिक सुधारणेस वेग येऊन राजकीय मतभेद कमी होण्यास नक्कीच मदत होईल. म्हणून आपण सर्वांनी भारतीय संविधानाचे समर्थक बनून धम्म आणि समाजकार्यात सहभागी झाले पाहिजे, असे सांगितले

या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान राष्ट्रपती शौर्य पदकाने सन्मानित असलेले सामाजिक कार्यकर्ते सुभाष कांबळे यांनी भूषविले. तर सुत्रसंचालन ज्येष्ठ पत्रकार श्याम साळवी केले.

## दुखवटा

### मंगेश चव्हाण



**माणगाव :** तालुक्यातील मौजे कडापूर येथील मंगेश जयराम चव्हाण यांचे दि. १५ डिसेंबर रोजी दुःखद निधन झाले. मंगेश चव्हाण हे माणगाव शिक्षण प्रसारक मंडळाच्या अशोकदादा साबळे विद्यालयात शिपाई म्हणून कार्यरत होते. त्यांचा दशक्रिया विधी दि. २४ डिसेंबर व उत्तरकार्य दि. २६ डिसेंबर रोजी राहत्या घरी कडापूर येथे होणार आहे.

# भाजपच्या पुढाकाराने जुई गावची पाणीसमस्या सुटली

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जुई गावात गेल्या दहा दिवसांपासून तीव्र पाणीटंचाईची समस्या निर्माणझाली होती. या गंभीर समस्येमुळे ग्रामस्थांचे हाल होत असताना,भाजपच्या लोकप्रतिनिधी आणि जुई गाव ग्रामस्थ कमिटीने तातडीने पुढाकार घेत संबंधित यंत्रणांना एकत्र आणत प्रभावी उपाययोजना केल्या.



या समस्येच्या पार्श्वभूमीवर भाजपच्या नगरसेवकांसह जुई गाव ग्रामस्थ कमिटीने सिडकोचे अधिकारी, पनवेल महानगरपालिका तसेच नवी मुंबई महानगरपालिकेच्या अधिकाऱ्यांसोबत संयुक्त बैठक घेतली. या बैठकीत जुई गावातील पाणीपुरवठा तात्काळ सुरळीत करण्याबाबत स्पष्ट व ठाम सूचना देण्यात आल्या.

प्रारंभी महानगरपालिकेच्या वतीने पुढील दहा दिवस पाणीपुरवठा कमी राहील, अशी माहिती देण्यात आली होती. मात्र, नागरिकांना आणखी प्रतीक्षा नको असल्याने भाजपच्या लोकप्रतिनिधींनी दहा दिवसांचा विलंब न करता ही समस्या तातडीने सोडवावी, अशी ठाम भूमिका मांडली. तपासणीदरम्यान जलवाहिनी व पाणीपुरवठ्याचा व्हॉल्व्ह जीर्ण अवस्थेत असल्याचे निदर्शनास आले.

यानंतर नवी मुंबई महानगरपालिकेच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांशी थेट संपर्क साधून केवळ दोन दिवसांत जलवाहिनी व व्हॉल्व्हची आवश्यक दुरुस्ती व बदल करण्यात आला. परिणामी, दुसऱ्याच दिवशी जुई गावात मुबलक पाणीपुरवठा सुरू करण्यात आला आणि पाणीटंचाईची समस्या यशस्वीरित्या मार्गी लागली.

या संपूर्ण प्रक्रियेत भाजप कामोठे शहरध्यक्ष तथा माजी नगरसेवक विकास घरत, समाजसेवक रवी गोवारी, समाजसेवक भाऊ भगत, प्रभाग अध्यक्ष चंद्रकांत कडू, जुई ग्रामस्थ पंच कमिटीचे सदस्य प्रवीण चिमणे व मंगेश चिमणे यांनी मोलाची भूमिका बजावली.

वेळीच हस्तक्षेप करून नागरिकांची समस्या सोडवल्याबद्दल जुई गावातील नागरिकांनी भाजपच्या लोकप्रतिनिधींसह ग्रामस्थ कमिटीचे आभार मानले असून, परिसरात समाधानाचे वातावरण निर्माण झाले आहे.

## पनवेल रेल्वे स्टेशन परिसरातून दुचाकीची चोरी

**पनवेल :** येथील रेल्वे स्टेशन परिसरात पार्क केलेली मोटारसायकल अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याची घटना घडली. चिखले येथे राहणारे निशांत मेढेकर यांनी यामाहा कंपनीची एम.एच ४६ ए.टी ३४२० क्रमांकाची मोटरसायकल पनवेल रेल्वे स्टेशनसमोरील मैदानात पार्क केली होती. ती चोरून नेल्याने पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## इमारतीमधून साहित्याची चोरी

**पनवेल :** शहरातील उरण नाका येथील एका इमारतीमधून साहित्याची चोरी झाल्याची घटना घडली आहे. पनवेल शहरातील उरण नाका येथील गितांजली टॉवर येथील पाचव्या मजल्यावरील एका खोलीत काम चालू असताना अज्ञात चोरट्याने कडी-कोयंडा तोडून आतील सुमारे ५६ हजार ४०० रुपये किमतीचे साहित्य चोरून नेले. याप्रकरणी पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा आहे.



**पनवेल : अखिल आगरी समाज परिषदेचे मुखपत्र असलेल्या आणि लोकनेते दि.बा. पाटील यांचा संस्थापक म्हणून वारसा लाभलेल्या आगरी दर्पणची सन २०२६ सालची दिनदर्शिका प्रसिद्ध झाली आहे. माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते शुक्रवारी या दिनदर्शिकेचे प्रकाशन झाले. अखिल आगरी समाज परिषदेच्या माध्यमातून समाजाचे प्रश्न आणि संस्कृती जपण्याचे काम आगरी दर्पण सातत्याने करत आहे. या दिनदर्शिकेच्या प्रकाशन सोहळ्यास सहव्यवस्थापक डी.बी. पाटील, विद्याधर पाटील यांच्यासह समाजातील अनेक मान्यवर आणि पदाधिकारी उपस्थित होते.**





**पनवेल : रयत शिक्षण संस्थेचे रायगड विभागाचे पीआरओ बाळासाहेब कारंडे यांच्या ७१व्या जन्मदिनाबद्दल संस्थेचे मॅनेजिंग कौन्सिल सदस्य, माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर आणि आमदार प्रशांत ठाकूर यांनी शुभेच्छा दिल्या. या वेळी लोकनेते रामशेठ ठाकूर इंग्लिश मीडियम स्कूल आणि ज्युनिअर कॉलेज कामोठेच्या प्राचार्य स्वप्नाली म्हात्रे, रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूलचे मुख्याध्यापक अविनाश कुलकर्णी व वरिष्ठ लिपिक संतोष गुजर उपस्थित होते.**

# पागोटे गावचे माजी सरपंच योगेश पाटील यांच्यावर भ्याड हल्ला

**उरण : वार्ताहर**

द्रोणागिरी नोड सेक्टर २ धुतूम-पागोटे रस्त्यावरुन प्रवास करणारे पागोटे गावचे माजी सरपंच योगेश पाटील यांच्यावर जीवे ठार मारण्याच्या उद्देशाने अज्ञात वाहन चालकांनी गैरकायद्याची माणसे गोळा करून हल्ला केल्याची घटना शुक्रवारी (दि. १९) सकाळी १०.५५च्या सुमारास घडली. योगेश पाटील यांनी प्रसंग सावधगिरी बाळगून आपली फोर व्हीलर गाडी घटनास्थळावरुन काढल्याने ते थोडक्यात बचावले आहेत, मात्र त्यांच्या गाडीचे नुकसान झाले असून या घटनेसंदर्भात उरण पोलीस अज्ञात हल्लेखोरांचा शोध घेत आहेत.





मिळालेल्या माहितीनुसार पागोटे गावचे माजी सरपंच योगेश पाटील हे शुक्रवारी नेहमी प्रमाणे आपल्या कामानिमित्ताने सकाळी द्रोणागिरी नोड सेक्टर २ येथील धुतूम-पागोटे रस्त्यावरुन आपल्या फोर व्हीलर गाडीमधून प्रवास करत होते. यावेळी एपीएम टर्मिनलस या ठिकाणच्या रस्त्यावर बेकायदेशीर पार्किंग करुन ठेवलेल्या कंटेनर ट्रेलरने मागचा पुढचा विचार न करता आपले वाहन सुरू करुन योगेश पाटील यांच्या वाहनाला ओव्हरटेक करण्याच्या उद्देशाने धडक दिली.

यावेळी योगेश पाटील यांनी सदर अपघातासंदर्भात ट्रेलर चालकाला जाब विचारायला त्यावेळी दोघांमध्ये बाचाबाची झाली. यादरम्यान सदर ट्रेलरचालकाने आपल्या इतर सहकाऱ्यांना आवाज दिला. यावेळी आठ ते दहा नशेबाज इसमाने मागचा पुढचा विचार न करता योगेश पाटील यांच्या अंगावर धावून गेले.

यावेळी योगेश पाटील यांनी मी याच गावातील आहे असे सांगितले. त्यावेळी गावातल्यास ठोका असा आवाज आल्याने सदर घटनेचे गांभीर्य ओळखून योगेश पाटील यांनी घटनास्थळावरून आपली फोर व्हीलर गाडी काढली. त्याचदरम्यान सदर इसमाने त्यांच्या गाडीवर दगडफेक करण्यास सुरुवात केली. योगेश पाटील यांच्या सावधगिरीमुळे ते थोडक्यात बचावले, मात्र त्यांच्या गाडीचे नुकसान झाले आहे. या घटनेसंदर्भात उरण पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक हनीफ मुलानी यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस अधिकारी, कर्मचारी सदर अज्ञात हल्लेखोरांचा शोध घेत आहेत.

सिडकोच्या धुतूम व पोगोटे ग्रामपंचायत हद्दीतील भूखंडावर मोठ्या प्रमाणात अनाधिकृत पार्किंगचा व्यवसाय सुरू आहे. अशा पार्किंगवर मिळणाऱ्या दारु व अंमली पदार्थांचे सेवन हे बंदरात ये-जा करणारे वाहनचालक करत आहेत. वाहनचालक आपली वाहने रस्त्यावर, सर्व्हिस रोडवर आडवी उभी करून वाहतूक कोंडीबरोबर अपघाताला धोका निर्माण करत आहेत. या संदर्भात विचारणा केली असता ते आपली दहशत निर्माण करत आहेत. तरी अशा बेकायदेशीर पार्किंगवर व नशेबाज बेशिस्त वाहनचालकांवर संबंधित प्रशासनाने कठोर कारवाई करणे गरजेचे आहे. नाहीतर भविष्यात नागरिकांच्या जीवितास धोका निर्माण होणार आहे, असे पागोटे ग्रामपंचायतीच्या माजी सरपंच पूनम पाटील यांनी म्हटले आहे.

## शिव कामगार सेना शहरप्रमुखपदी सिद्धेश जगे

**पनवेल :** शिवसेना मुख्य नेते एकनाथ शिंदे (उप-मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य) यांच्या आदेशानुसार महाराष्ट्र अध्यक्ष सुधीर कुरुमकर व कार्याध्यक्ष डॉ. स्वप्नील दादा माने (पाटील) यांच्या मार्गदर्शनाने शिवसेना पक्षाच्या शिव कामगार सेना शहरप्रमुख (बेलापूर विधानसभा सीफेरर्स विभाग) पदी सिद्धेश जगे यांची नियुक्ती करण्यात आली. सदर नियुक्ती पत्रक सौ. शितल मोरे- बने महाराष्ट्र अध्यक्ष (सीफेरर्स विभाग) यांच्या हस्ते देण्यात आले. या वेळी शिवसेना शिव कामगार सेना कार्यकर्ते व समर्थक मंडळी उपस्थित होते.



# जेष्ठ साहित्यिक प्रा.चंद्रकांत मढवी यांच्या कथासंग्रहास पुरस्कार

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

आगरी युथ फोरम,डोंबिवली आयोजित अखिल भारतीय आगरी महोत्सवामध्ये पनवेलमधील जेष्ठ साहित्यिक, कोकण मराठी साहित्य परिषद नवीन पनवेल शाखेचे संस्थापक अध्यक्ष रायगडभूषण प्रा.ॲड. चंद्रकांत मढवी यांना, त्यांच्या अगरायन या कथासंग्रहास स्व.नकुल पाटील स्मृती आगरी साहित्य पुरस्कार ज्येष्ठ साहित्यिक डॉ.लक्ष्मीकांत देशमुख यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला.



हा पुरस्कार मिळाल्याबद्दल माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी प्रा.चंद्रकांत मढवी यांचे अभिनंदन केले.

या महोत्सव सोहळ्यामध्ये आगरी समाजभूषण पुरस्कार,कला,नृत्य अभिनय व विविध क्षेत्रातील प्राविण्य संपादन केलेल्या समाज बाधवाना आगरी समाज पुरस्काराचे वितरण करण्यात आले आहे. यावेळी माजी केंद्रीय मंत्री जगन्नाथ पाटील,अखिल भारतीय मराठी साहित्य मंडळाचे माजी अध्यक्ष डॉ. श्रीपाद जोशी, ९१वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष डॉ.लक्ष्मीकांत देशमुख, ज्येष्ठ पत्रकार समन्वयक राजेंद्र हुंजे, आगरी युथ फोरमचे अध्यक्ष गुलाबराव वझे व संमेलाध्यक्ष उपस्थित होते.

## पनवेल रेल्वे स्टेशनजवळ व्यक्तीस लुटणाऱ्याला अटक

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल रेल्वे स्टेशनकडे मालधक्का रोडने जाणाऱ्या एका इसमाला दुखापत करून त्याच्याकडील पैसे जबरीने काढून घेणाऱ्या एका आरोपीस पनवेल शहर पोलिसांनी अटक केली आहे.



समीर कुमार महंती, वय ५४ वर्षे, हे बस स्टँड, पनवेल येथून रेल्वे स्टेशनकडे मालधक्का रोडने जात असताना आरोपी ईद्रीस उर्फ बबल्या नियाज शेख (वय १९ वर्ष) याने त्यांच्याकडील पैसे जबरीने काढून घेतले व त्यांना दुखापत करून घटनास्थळावरून पळ काढला होता.

याबाबतची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल होताच वरिष्ठ पोलीस निरीक्षक नितीन ठाकरे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक हजरत पठाण, पोहवा संदेश म्हात्रे, पोहवा तुषार बोरसे, पोना मिथुन भोसले, रविंद्र पारधी, पोशि साईनाथ मोकल, किरण कराड आदींच्या पथकाने घटनास्थळी सीसी टिव्ही कॅमेरे उपलब्ध नसताना तसेच प्रत्यक्षदर्शी साक्षीदार नसतानाल संशयित आरोपी ईद्रीस उर्फ बबल्या नियाज शेख याला ताब्यात घेण्यात आले करण्यात आलेली आहे.

### बाल कविता संमेलन

# सौ. शकुंतला रामशेठ ठाकूर सीबीएसई स्कूलच्या काव्या सिंगची चमकदार कामगिरी

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

हिंदी पखवाडा निमित्ताने नियंत्रक महालेखाकार कार्यालयाच्या प्रोटोटाइप, डिझाईन आणि डिझाईन नियंत्रक विभागामार्फत आयोजित करण्यात आलेल्या मौलिक कविता स्पर्धा आणि बाल कविता संमेलनात उलवे नोडमधील सौ. शकुंतला रामशेठ ठाकूर सीबीएसई स्कूलची विद्यार्थिनी काव्या सिंगने चमकदार कामगिरी केली आहे.



या अनुषंगाने तिला दिल्ली येथील मुख्य कार्यालयात उत्कृष्ट रचना स्पर्धेत सहभागी होण्यासाठी व सन्मानित करण्यासाठी आमंत्रित करण्यात आले आहे.

या स्पर्धेसाठी पॅनेल स्तरावरील विद्यार्थ्यांसाठी 'मठ, शासकीय समुदाय, ऑपरेशन सिंदूर किंवा प्रतिभा संपदा' या समकालीन विषयांवर मौलिक कविता स्पर्धा घेण्यात आली. सादर करण्यात आलेली कविता पूर्णतः मौलिक असावी व कोणत्याही कृत्रिम साधनांनी तयार केलेली किंवा बांधकाम/भवनातून प्रेरित नसावी अशी अट होती.

हिंदी पखवाड्याच्या या उपक्रमात सौ. शकुंतला रामशेठ ठाकूर स्कूल सीबीएसई उलवे येथील इयत्ता आठवीची विद्यार्थिनी काव्या सिंह हिने सहभाग घेतला. पहिल्या फेरीत संपूर्ण भारतातून सर्वोत्तम १०० विद्यार्थ्यांमध्ये तिची निवड झाली. दुसऱ्या फेरीत ती सर्वोत्तम २५ विद्यार्थी मध्ये निवडली गेली. तिसऱ्या फेरीसाठी तिला दिल्ली येथील मुख्य कार्यालयात या उत्कृष्ट रचनेसाठी आणि स्पर्धेत सहभागी होण्यासाठी व सन्मानित करण्यासाठी आमंत्रित करण्यात आलेय.

# 'सीकेटी'त पारितोषिक वितरण सोहळा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

सीकेटी विद्यालयात दरवर्षीप्रमाणे अभ्यासक्रमाबरोबरच सहशालेय उपक्रमांचे आयोजन विद्यार्थ्यांसाठी केले जातात. त्याचाच एक भाग म्हणून वर्षभरात विविध स्पर्धांचे आयोजन केले गेले होते. या स्पर्धांमधील विजेत्या विद्यार्थ्यांसाठी आज पारितोषिक वितरण समारंभाचे आयोजन करण्यात आले होते.



या स्पर्धांचा पारितोषिक वितरण सोहळा आज दिनांक १८ डिसेंबर २०२५ रोजी आयोजित करण्यात आला होता. या स्पर्धेच्या उद्घाटन प्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून संस्थेच्या रामशेठ ठाकूर कॉलेज ऑफ कॉमर्स अँड सायन्स खारघरच्या प्राचार्य महेश्वरी झिरपे, शिक्षक पालक संघाच्या उपाध्यक्ष प्रिया काशिद , सदस्य जंगम, इंग्रजी प्राथमिकच्या मुख्याध्यापिका नीलिमा शिंदे, पूर्व प्राथमिकच्या पर्यवेक्षिका वैशाली पारधी, ज्युनिअर कॉलेजचे प्रभारी प्राचार्य मोरे, मुख्याध्यापक संतोष चव्हाण, पर्यवेक्षिका नीरजा अदुरी हे उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना शाळेचे मुख्याध्यापक संतोष चव्हाण यांनी शाळेच्या आतापर्यंतच्या शैक्षणिक वाटचालीची व उपलब्धीबाबतची माहिती उपस्तितांना सादर केली. विद्यार्थ्यांना अशाच स्पर्धामध्ये सहभागी होऊन बक्षिसे मिळविण्यासाठी प्रोत्साहन दिले.

या वेळी बोलताना आजच्या प्रमुख पाहुण्या महेश्वरी झिरपे यांनी सर्व बक्षिसे प्राप्त विद्यार्थ्यांचे कौतुक केले आणि भविष्यात अशाच प्रकारची चांगली कामगिरी करत शाळेचे नाव उज्वल करा असा संदेशही दिला.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्राची इसे यांनी केले. या कार्यक्रमासाठी विद्यालयातील सर्व शिक्षक तसेच संगीत शिक्षक रुपेश मढवी, तबला वादक खरे या शिक्षकांचे विशेष सहकार्य लाभले.

आभारप्रदर्शन पूर्वा खेडेकर यांनी केले. कार्यक्रम अतिशय सुंदर रीतीने पार पाडल्याबद्दल मुख्याध्यापकांनी सर्वांचे कौतुक केले.


## संपादकीय

# मरणाने करावी सुटका

एका ३२ वर्षीय तरुणाच्या वतीने सर्वोच्च न्यायालयात इच्छामरणाची याचिका दाखल करण्यात आल्याने देशात पुन्हा एकदा इच्छामरण हा विषय चर्चेत आला आहे. गेली काही वर्षे या तरुणाचे आईवडील या संदर्भात न्यायालयाचे दरवाजे ठोठावत आहेत. गुरुवारी अखेर सर्वोच्च न्यायालयाने या तरुणाच्या प्रकरणात निर्णय घ्यायला हवा हे मान्य केले.

**चंदीगड विद्यापीठातून इंजिनिअरिंगचे शिक्षण घेणारा हरीश राणा २०१३मध्ये पेइंग गेस्ट सुविधेच्या इमारतीच्या चौथ्या मजल्यावरून पडल्यापासून निष्क्रिय अवस्थेत बेडवर पडून आहे. मेंदूच्या दुखापतींमुळे त्याच्या शरीराला १०० टक्के अपंगत्व आले आहे. त्याचे ६५ वर्षीय वडील अशोक राणा आणि ६२ वर्षीय आई निर्मला राणा गेल्या जवळपास १३ वर्षांपासून त्याला या अवस्थेत पाहात आहेत. दहा वर्षे त्यांना आशा वाटत होती की आपला मुलगा बरा होईल, पण २०२३मध्ये मात्र त्यांनी दिल्ली उच्च न्यायालयाकडे आपल्या मुलाला इच्छामरण देण्याची मागणी केली. तेव्हा हरीशला कोणत्याही मशीनच्या मदतीने जिवंत ठेवले जात नसून तो कुणाच्याही मदतीशिवाय श्वास घेऊ शकतो. त्यामुळे त्याला औषध देऊन मारण्याची परवानगी देणे शक्य नाही असे न्यायालयाने म्हटले होते. आता मात्र डॉक्टरांच्या मते सध्याच्या अवस्थेतून तो बरा होण्याची शक्यता अत्यंत कमी आहे. त्याचे श्वसन आणि आहार फक्त तांत्रिक नळ्यांवर अवलंबून आहे व त्याची अवस्था अत्यंत दयनीय आहे असे निरीक्षण आता सर्वोच्च न्यायालयानेही नोंदवले आहे. २०१८मध्ये सर्वोच्च न्यायालयाने निष्क्रिय इच्छामरणाला व लिव्हिंग विल तयार करण्यास कायदेशीर मान्यता दिली होती. या निर्णयानुसार भारतातील लोक पॅसिव्ह यूथनेशियाची म्हणजे निष्क्रिय इच्छामरणाची निवड करू शकतात. लिव्हिंग विलच्या अंमलबजावणीसाठी न्यायालयाने नियम निश्चित केले होते. त्यानंतर २०२३मध्ये न्यायालयाने हे नियम व्यवहार्य करण्यासाठी आदेशात सुधारणाही केली. या अंतर्गत एखाद्या व्यक्तीला आपल्यावरील उपचार बंद करण्याचा अधिकार देण्यात आला. मात्र क्टिव्ह यूथनेशिया करण्यास आपल्या देशात मनाई आहे. एखाद्या व्यक्तीला जाणीवपूर्वक आत्महत्या करण्यासाठी मदत करणारी कृती म्हणजे क्टिव्ह यूथनेशिया होय. २०११मध्ये अरुणा शानबाग यांच्या प्रकरणात सर्वोच्च न्यायालयाने अरुणा शानबाग यांना निष्क्रिय इच्छामरण नाकारले होते. तसे करताना त्या जीवनरक्षक यंत्रांवर नसल्याचे न्यायालयाने स्पष्ट केले होते, परंतु त्याचवेळी पहिल्यांदाच इच्छामरणाबाबतच्या कायदेशीरतेला मात्र न्यायालयाने मान्यता दिली होती. पत्रकार पिंकी विरानी यांनी २००९मध्ये सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल करून अरुणा यांच्यावरील उपचार थांबवण्याची मागणी केली होती. आता सर्वोच्च न्यायालयाच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार लिव्हिंग विल दोन साक्षीदारांसमोर सही केलेले व न्यायिक दंडाधिकाऱ्यांनी प्रमाणित केलेले असणे आवश्यक आहे. रुग्णावरील उपचार थांबवण्यासाठी रुग्णालयातील वैद्यकीय मंडळ आणि बाह्य वैद्यकीय मंडळ यांची मंजुरी आवश्यक असते. रुग्णाचे लिव्हिंग विल नसल्यास कुटुंबियांची संमती आवश्यक असते. या किचकट अटींमध्ये बदल करण्याची मागणी २०१९मध्ये इंडियन सोसायटी ऑफ क्रिटिकल केअर मेडिसिनने केली होती. जगभरातील मोजक्याच देशात इच्छामरणाला परवानगी असली तरी कुठल्याच देशात यासंबंधातील कायदे सोपे नाहीत. आपल्याकडे लिव्हिंग विलला कायदेशीर मान्यता असली तरी अद्याप देशात तिचा फारसा स्वीकार झालेला नाही. या प्रकारास काही लोकांचा विरोधही आहे, तर काही लोक या संदर्भातील गैरसमज दूर करून जागरुकतेसाठी प्रयत्नशील आहेत.**

# समाजसुधारक संत गाडगे महाराज



एक थोर आधुनिक मराठी संत व समाजसुधारक गाडगे महाराज यांचा जन्म शेणगाव (जि. अमरावती ) येथे २३ फेब्रुवारी १८७६ रोजी परीट जातीत झाला. वडिलांचे नाव झिंगराजी व आईचे सखूबाई. आडनाव जाणोरकार. त्यांचे मूळ नाव डेबूजी असे होते. तथापि त्यांचा वेश म्हणजे अंगावर फाटकी गोधडी आणि हातात गाडगे असा असल्यामुळे लोक त्यांना 'गोधडे महाराज' किंवा 'गाडगे महाराज' म्हणूनच ओळखत. संत गाडगे महाराज यांचा आज स्मृतीदिन आहे. त्यानिमित्त जाणून घेऊया त्यांच्याविषयी या लेखातून...

१९१२मध्ये डेबूजी यांचा कुंताबाईशी विवाह झाला, परंतु संसारात त्यांचे मन रमले नाही. पुढे काही वर्षांनी घर सोडून तीर्थयात्रा करीत ते फिरू लागले. समाजातील कमालीचे अज्ञान, अनिष्ट चालीरीती व अंधश्रद्धा पाहून त्यांनी निरपेक्ष लोकसेवेचे व लोकशिक्षणाचे व्रत स्वीकारले. लहानपणापासूनच त्यांना भजन-कीर्तनांची आवड होती आणि त्यांची वृत्तीही धार्मिक व परोपकारी होती. समाजसुधारणेसाठी व लोकशिक्षणासाठी त्यांनी कीर्तनाचे माध्यम प्रभावीपणे वापरले. ते निरक्षर असले तरी त्यांची भाषा सुबोध व सर्वसामान्यांच्या एकदम हृदयाला जाऊन भिडणारी होती. महाराष्ट्रात सर्वत्र तसेच गुजरात, कर्नाटक व आंध्र प्रदेशाच्या काही भागांत त्यांनी गावोगाव कीर्तने करून लोकजागृती केली. त्यांचा नैतिक उपदेश साधा व सर्वसामान्यांना उपयुक्त ठरावा असाच होता.

'चोरी करू नये, कर्ज काढून चैन करू नये, दारू पिऊ नये, देवापुढे पशूंचा बळी देऊ नये', अशा प्रकारचा उपदेश ते आपल्या कीर्तनांतून मार्मिक उदाहरणे देऊन करीत. पारंपरिक, पारमार्थिक विषयांसोबतच व्यावहारीक व नैतिक विषयांचाही त्यांनी आपल्या कीर्तनांतून लोकजागृतीसाठी चांगला उपयोग करून घेतला.

स्वच्छता, प्रमाणिकपणा व भूतदया यांवर त्यांचा विशेष भर असे. तीर्थयात्रेच्या ठिकाणी ते जात; परंतु देवदर्शन न घेता मंदिराच्या बाहेर थांबून यात्रेकरूंची सेवा करीत व तेथील परिसर स्वतःच्या हातांनी स्वच्छ करी. खाण्यापिण्याच्या बाबतीतही त्यांचा कमालीचा साधेपणा होता. श्रीमंत भक्तांनी दिलेले चांगले अन्न ते भिकाऱ्यांना वाटून टाकीत आणि स्वतः गरिबाच्या घरची चटणी-भाकरी मागून आणून खात.

लहानपणापासूनच ते जातिपंथभेदातीत होते. जातिभेद नष्ट करून एकजिनसी समाज निर्माण व्हावा, असे त्यांना मनापासून वाटे व त्या दृष्टीने यांचे आचरण आणि प्रयत्नही असत. पंढरपूर, नासिक, त्र्यंबकेश्वर, आळंदी इ. ठिकाणी यात्रेकरूंचे अत्यंत हाल होत, म्हणून त्यांनी त्यांच्या सोयीसाठी प्रशस्त धर्मशाळा बांधल्या. विदर्भातील ऋणमोचन येथे त्यांनी लक्ष्मीनारायणाचे मंदिर उभारले व नदीवर घाटही बांधला. अनेक ठिकाणी त्यांनी गोरक्षण संस्थाही उभारल्या तसेच अनाथांसाठी व अपंगांसाठी अनेक प्रकारे कार्य केले. समाजसेवा करणाऱ्या अनेक संस्थांनाही त्यांनी उदारहस्ते देणग्या दिल्या.

अनेक ठिकाणी देवाधर्माच्या नावावर चालणारी पशुहत्या त्यांनी बंद केली. अध्यात्माच्या जंजाळात न शिरताही, संसारातच राहून ईश्वरभक्ती करता येते, अशी साधी व सरळ शिकवण त्यांनी समाजास दिली. 'संत तुकाराम महाराज आमचे गुरू आहेत व माझा कोणीही शिष्य नाही ', असे ते म्हणत. त्यांनी म्हटल्याप्रमाणे त्यांची गादी अथवा मठ कोठेही निर्माण झाला नाही.

समाजात शिक्षणप्रसार करून अनेक शिक्षणसंस्थांना त्यांनी मदत केली. लोकांची त्यांच्यावर नितांत श्रद्धा होती; त्यामुळे लोकांनी त्यांना विपुल पैसा दिला. तो सर्व त्यांनी लोकोपयोगी कार्यात वेचला. त्यांनी उभारलेल्या सर्वच संस्थांचा कारभार विश्वस्त मंडळेच पाहतात.

गाडगे महाराजांविषयी बहुजनसमाजात कमालीचा आदरभाव आहे. त्यांनी महाराष्ट्रात केलेले लोकजागृतीचे व लोकसेवेचे कार्य अत्यंत मोलाचे आहे. प्रवास करीत असता अमरावतीजवळ त्यांचे अचानक २० डिसेंबर १९५६ रोजी निधन झाले. त्यांची समाधी अमरावती येथे आहे.

(साभार : विकासपीडिया)

# कवी, समीक्षक, विचारवंत दया पवार



दगडू मारुती पवार उर्फ दया पवार हे कवी, कथाकार, समीक्षक, विचारवंत, मराठी साहित्यिक होते. यांचा आज स्मृतिदिन. जन्म १५ सप्टेंबर १९३५ रोजी अहमदनगरमधील धामणगाव येथे झाला. संगमनेरच्या बोर्डिंगमध्ये राहून त्यांनी मॅट्रिकपर्यंत शिक्षण पूर्ण केले. १९५६मध्ये मुंबईतील पशुवैद्यक महाविद्यालयात त्यांनी लेखनिक व प्रयोगशाळा सहायक म्हणून नोकरीस सुरुवात केली. १९६७मध्ये अस्मितादर्शमध्ये त्यांची पहिली कविता प्रसिद्ध झाली. दलित साहित्य चळवळीच्या कार्यात १९६८पासून त्यांचा सक्रिय सहभाग होता.

१९६९मध्ये मराठवाडा साहित्य परिषदेच्या प्रतिष्ठान मुखपत्रात त्यांचा दलित साहित्यावर लिहिलेला लेख पहिल्यांदा प्रसिद्ध झाला. श्रीलंकेत कोलंबोमध्ये १९७५ला भरलेल्या जागतिक बुद्ध परिषदेलाही ते हजर होते. दया पवार यांनी विपुल लिखाण केले. त्यापैकी 'बलुतं' हे १९७८मध्ये प्रसिद्ध झालेले त्यांचे आत्मचरित्र खूप गाजले. दलित जीवनाची एक वेगळी ओळख त्यांनी यातून करून दिली. १९७९मध्ये राज्य शासनाचा पुरस्कारही बलुतंला मिळाला. त्या आधी 'कोंडवाडा' (१९७४) या त्यांच्या काव्यसंग्रहालाही १९७५मध्ये राज्य शासनाचा पुरस्कार मिळाला.

'बलुतं' हे मराठी भाषेतील पहिले प्रकाशित दलित आत्मकथन होय. दगडू मारुती पवार यांच्या चाळीस वर्षाच्या जीवनप्रवासाची आत्मकहाणी या आत्मकथनात मांडली आहे. समाजव्यवस्थेने तुडवलेल्या, दुःखाग्नीने पोळलेल्या दगडूची ही कहाणी आहे. हजारो वर्षे जो समाज उपेक्षित-वंचित राहिला, अज्ञान, दैन्य आणि दास्य यांच्या गर्तेत खितपत राहिला अशा महार जातीत दगडूचा जन्म झाला. दगडूचे बालपण खेड्यात आणि शहरात अशा दोन्ही ठिकाणी गेलेले आहे. धामणगावचा महारवाडा, तेथील चावडी, चावडीसमोरचे पटांगण, तिथले खेळ, भांडणतंटे हे सर्व त्यांच्या बालपणीच्या भावविश्वात रूतून बसलेले आहे. गावकीची कामे करणे, बड्या अंमलदारांच्या घोड्यापुढे धावणे, त्यांच्या जनावरांची देखभाल करणे, दवंडी देणे, मयताचा सांगावा पोहोचविणे, मेलेली जनावरे ओढणे, लाकडे फोडणे, गावची जत्रा वाजविणे अशी कामे महार जातीतील लोकांना करावी लागत आणि या कामाच्या मोबदल्यामध्ये त्यांना जे धान्य, वैरण मिळत असे त्या मोबदल्याला बलुतं असे म्हणत. उच्चवर्णीयांकडून दलितांना मिळणारी उपेक्षेची वागणूक, अज्ञान-अंधश्रद्धा, खेडे आणि शहरातील दलित व स्त्रियांचे दुःखभोग या आत्मकथनात आलेले आहे.

माणसाला चिकटलेल्या जातीची आणि शोषणाचीही व्यथा या आत्मकथनातून दया पवार यांनी मांडली आहे. 'बलुतं' हे वास्तव जीवनाचा कलात्मपूर्ण प्रत्यय आणून देणारे आत्मकथन असून त्यामुळे मराठी वाङ्मयात एक नवी मोलाची भर पडलेली आहे.

याशिवाय 'विटाळ' कथासंग्रह (१९८३), 'बलुतं एक वादळ' (१९८३), 'चावडी' स्फुटलेख (१९८३), 'पासंग'(१९९३) व 'जागल्या' स्तंभलेखन, 'पाणी कुठंवर आलं गं बाई' काव्यसंग्रह, 'कल्लपा यशवंत ढाले यांची डायरी' (१९८४), 'धम्मपद' पाली भाषेतील धम्मपदांचा मराठी अनुवाद (१९९१) असे आजवर त्यांचे साहित्य प्रकाशित झाले. १९९४-९५मध्ये ते परिवर्तन साहित्य महामंडळाचे अध्यक्ष होते. भारत सरकारने दया पवार यांना पद्मश्री पुरस्कार देऊन गौरवले आहे. अशा या थोर साहित्यिकाचे २० सप्टेंबर १९९६ रोजी निधन झाले.

(साभार : इंटरनेट)



## बदलते तंत्रज्ञान

# स्मार्टफोनमध्ये स्टोरेज कमी पडतंय? वापरा 'ही' ट्रिक

जेव्हा तुम्हाला ईमेल पाठवण्यात, गूगल फोटोजमध्ये एखादा फोटो निवडण्यास अडथळा निर्माण होतो. मग तेव्हा आपण नको असलेले फोटो, व्हिडीओ, फाईल्स डिलीट करण्यास सुरुवात करतो.





स्मार्टफोनमध्ये सतत स्टोरेजची समस्या येतेय? बहुतेक स्मार्टफोन आता १२८ जीबी स्टोरेजसह येतात, पण स्मार्टफोनमधील हे स्टोरेज महत्त्वाचे फोटो, व्हिडीओ, फाईल्सने लगेच भरून जातात. पण, आपण सहसा या गोष्टीकडे दुर्लक्ष करतो. जेव्हा स्टोरेज भरलेले असते, तेव्हा तुम्हाला ई-मेल पाठवण्यात, गूगल फोटोजमध्ये एखादा फोटो निवडण्यास अडथळा निर्माण होतो. मग तेव्हा आपण नको असलेले फोटो, व्हिडीओ, फाईल्स डिलीट करण्यास सुरुवात करतो

फोनमधील स्टोरेजची समस्या सोडवण्यासाठी आम्ही एक खास युक्ती घेऊन आलो आहोत. अण्ड्रॉइड स्मार्टफोनमध्ये अनेक नको असलेले ॲप्सदेखील जास्त स्टोरेज फूल होण्यास कारणीभूत असतात. अनेक इन्स्टॉल केलेले ॲप्स फोनमधील महत्वाची जागा व्यापून घेतात. यातील असे अनेक ॲप्स असतात, जे आपण इन्स्टाल करतो, पण त्याचा वापर करतच नाही.

ॲण्ड्रॉइड युजर्ससाठी, गुगलने एक फीचर सादर केले आहे, जे न वापरलेले ॲप्स आपल्या फोनवरून अर्काइव्ह करतात आणि स्मार्टफोनमधील जागा मोकळी करतात. न वापरलेले ॲप्सचे चिन्ह, युजर डेटा आणि बेसिक फंक्शनलिटी इन्टॅक्टसह युजर्स रिमूव्ह करू शकतात. जेव्हा डिव्हाइसचे स्टोरेज कमी असेल तेव्हा तुम्ही ते पुन्हा ऑटो-अर्काइव्ह करू शकता.

आता या फीचरचा वापर कसा करायचा चला पाहू मोबाइलमधील प्ले स्टोअरमध्ये जा. प्रोफाइल आयकॉनवर क्लिक करा.

यानंतर सेटिंग पर्यायावर क्लिक करा.सगळ्यात वर असणाऱ्या जनरलवर क्लिक करा.

खाली स्क्रोल करा आणि ॲटोमॅटीकली अर्काइव्ह ॲप ऑन करा. एकदा तुम्ही हे फीचर एनेबल केले की, तुमच्या फोनवरील न वापरलेले ॲप्स अर्काइव्ह केले जातील. कोणतीही महत्त्वाची फाईल डिलीट न करता तुम्ही तुमच्या फोनचे स्टोरेज अगदी सोप्या पद्धतीने खाली करू शकता.

# थोर संस्कृत विद्वान विष्णू बापट



निमित्त

विष्णू वामन बापट हे संस्कृत विद्वान, भाषांतरकार व शास्त्रसुधारक होते. त्यांचा जन्म २२ मे १८७१ रोजी रत्नागिरीतील धालवल येथे झाला. त्यांचे शिक्षण रामदुर्ग, शिरोळ आणि मिरज येथे इंग्रजी पाचवीपर्यंत झाले. त्यानंतर त्यांनी तारमास्तराच्या कामाचे ज्ञान मिळविले. निरनिराळ्या रेल्वे कार्यालयांतून नोकऱ्या केल्या.

त्या करीत असतानाच संस्कृतच्या अभ्यासाची ओढ निर्माण झाल्यामुळे संस्कृत शिकले व वाई येथील प्रज्ञानंद सरस्वतींकडे त्यांनी वेदान्ताचे अध्ययन केले. अध्ययनकाळात चरितार्थासाठी वाईच्या मोदवृत्त छापखान्यात मुद्रितशोधकाची नोकरी केली. १९०३ ते १९१२ या काळात सिंध हैदराबाद येथील संस्कृत पाठशाळेचे मुख्याध्यापक म्हणून त्यांनी काम पाहिले. १९१२ साली पुण्यास येऊन ग्रंथप्रकाशनाचा व्यवसाय त्यांनी सुरू केला.


ब्रह्मविद्याग्रंथरत्नमाला (मासिक), आचार्य (पाक्षिक) आणि आचार्यकुल (मासिक) ह्यांसारखी नियतकालिके चालविली. संस्कृतातील बरेचसे प्राचीन तत्त्वज्ञान, साहित्य बापटांनी मराठीत आणले, ही त्यांची फार मोठी कामगिरी होय. गीता, उपनिषदे आणि ब्रह्मसूत्र या प्रस्थानत्रयीचा शांकरभाष्यानुसार परिचय त्यांनी मराठीतून घडविला. तसेच भारतीय तत्त्वज्ञानातील अद्वैतादी विविध दर्शनांवर मराठीतून लेखन केले.

रामानुज, पूर्णप्रज्ञ, माहेश्वर, जैमिनी-पाणीनी या दर्शनांवर त्यांनी समतभेद लिहिले. तर जैन, बौद्ध, चार्वाक या दर्शनांचा परिचय घडविताना त्यांचे खंडनही केले. शंकराचार्यकृत आत्मबोध आणि अपरोक्षानुभूती या ग्रंथांचे त्यांनी केलेले अनुवादही उल्लेखनीय आहेत. त्यांनी १९२५मध्ये 'आचार्यकुल' या नावाची एक अध्यापन संस्थाही स्थापन केली होती. अशा या थोर शास्त्रसुधारकाचे २० डिसेंबर १९३३ रोजी निधन झाले.

गीता, उपनिषदे आणि ब्रह्मसूत्र या प्रस्थानत्रयीचा शांकरभाष्यानुसार परिचय त्यांनी मराठीतून घडविला. तसेच भारतीय तत्त्वज्ञानातील अद्वैतादी विविध दर्शनांवर मराठीतून लेखन केले. रामानुज, पूर्णप्रज्ञ, माहेश्वर, जैमिनी-पाणीनी या दर्शनांवर त्यांनी समतभेद लिहिले तर जैन, बौद्ध, चार्वाक या दर्शनांचा परिचय घडविताना त्यांचे खंडनही केले. ब्रह्मसूत्रशारीरभाष्यार्थही त्यांनी तीन भागांत सांगितला. मूळ सूत्र, सूत्रार्थ, शांकरभाष्य, अवतरणे, स्पष्टीकरण आणि भामत्यादी टीकाकारांचा अधिक आशय व्यक्त करणाऱ्या टीपा यांसह हा भाष्यार्थ त्यांनी दिला आहे. शंकराचार्यकृत आत्मबोध आणि अपरोक्षानुभूती या ग्रंथांचे त्यांनी केलेले अनुवादही (१९२ १९३) उल्लेखनीय आहेत. त्यांनी मराठीत अनुवादिलेल्या ग्रंथात सोमदेवाच्या कथासरित्सागराचाही समावेश होतो (भाग १ ते ४ १९११-१९१२). धर्मराजा ध्वरींद्रकृत वेदान्तपरिभाषा ह्या ग्रंथाच्या विवरणाचे तसेच वेदान्त शब्दकोशाचे कामही त्यांनी हाती घेतले होते. तथापि ते त्यांच्याकडून अपूर्ण राहिले. या दोन्ही कामांचा उर्वरित भाग रंगनाथ दत्तात्रेय वाडेकर यांनी पूर्ण केला आणि वेदान्तपरिभाषा व वेदान्तशब्दकोश हा ग्रंथ प्रसिद्ध झाला (१९३३). बापट हे निष्ठावंत शांकरमतानुयायी असल्यामुळे टिळकांच्या गीतारहस्यातील कर्मयोगवादी भूमिकेला त्यांनी विरोध केला. बापटांनी १९२५मध्ये 'आचार्यकुल' या नावाची एक अध्यापनसंस्थाही स्थापिली होती.

(साभार : इंटरनेट)

## चित्र रंगवा



## आरोग्य प्रहर

# ...ही फळे रिकाम्या पोटी खाणे अधिक फायदेशीर

शरीरास पोषण देण्याच्या बाबतीत फळाला कोणताच पर्याय नाही. फळे शरीराला विविध प्रकारची व्हिटामिन्स देतात, मात्र तुम्हाला माहीत आहे का की काही फळे रिकाम्या पोटी खाल्ल्यास अधिक फायदा होतो. असे यासाठी कारण रिकामे पोट अधिक प्रमाणात पोषकतत्वे शोषून घेते. त्याचवेळेस आपली पाचनसंस्था अन्य खाद्य पदार्थांसोबत स्पर्धा करत नसते. अशातच आम्ही तुम्हाला अशा सात फळांबद्दल सांगणार आहोत ज्यांच्या रिकाम्या पोटी सेवनाने अधिकाधिक लाभ मिळू शकतात...



**पपई** - पपईमध्ये पपेन आणि कायमोपॅपेनसारखे एन्झाईम मोठ्या प्रमाणात असतात. हे एन्झाईम पचनशक्ती सुधारण्यासाठी बद्धकोष्ठता रोखण्यासाठी जबाबदार आहेत. जेव्हा पपईचे रिकाम्या पोटी सेवन केले जाते तेव्हा पपईमधील व्हिटामिन ए, सी आणि ई चांगल्या प्रमाणात शरीरात शोषले जातात.

**टरबूज** - जर तुम्ही सकाळी उठल्यावर टरबूज खात असाल तर संपूर्ण रात्रभरानंतर हे तुमचे शरीर हायड्रेट ठेवण्याचे काम करते, कारण यात ९२ टक्के पाणी असते. यात लायकोपीन हे अँटी ऑक्सिडंट असते.

**ब्लू बेरी** - सकाळी सकाळी जर गोड खायची इच्छा झाली तर ब्लू बेरी खा. यात अँटी ऑक्सिडंट असतात जे रिकाम्या पोटी खाल्ल्याने मेंदूला उर्जा मिळते. तसेच शुगरही कंट्रोलमध्ये राहते.

**केळी** - सकाळी सकाळी केळी खाल्ल्याने शरीरास भरपूर उर्जा मिळते. यातील कार्बोहायड्रेट आणि नैसर्गिक शर्करा मोठ्या प्रमाणात असते.

**अननस** - अननस रिकाम्या पोटी खाण्यासाठी चांगले फळ आहे. यात व्हिटामिन सी आणि मँगनीज भरपूर प्रमाणात असते. यामुळे रोगप्रतिकारक क्षमता सुधारते तसेच हाडेही मजबूत होतात.

**सफरचंद** - दररोज एक सफरचंद खाल्ल्याने डॉक्टर दूर राहतात ही म्हण खरी आहे. जेव्हा रिकाम्या पोटी सफरचंद खातो तेव्हा ते आरोग्यासाठी चांगले असते. यात फायबर असतात जे पचनासाठी चांगले असतात तसेच भूक नियंत्रित करण्यास मदत करतात.

**किवी** - किवी भले छोटे फळ आहे, मात्र हे रिकाम्या पोटी खाल्ल्याने मोठे फायदे होतात. यामुळे रोगप्रतिकारक क्षमता वाढते.

# वावेहवेली धरण तळ्यासाठी जलसंजीवनी; पर्यटन आणि भाजीपाला उत्पादनास चालना

**तळा : प्रतिनिधी**

तळा तालुक्यातील वावेहवेली धरण एक तळा तालुक्यासाठी जलसंजीवनी ठरत असून पर्यटनासाठीही एक चालना मिळत असल्याचे पहावयास मिळत आहे.यावर्षी आता अनेक मुलांच्या सहलींना सुरुवात आली असून यासहली आता वावेहवेली धरणाकडे वळत असल्याचे पहावयास मिळत असून या धरण परिसर व धरण क्षेत्र पाहण्यासाठी पर्यटक व सहलींमधे वाढ झाली आहे. नयनरम्य निसर्गाचा आनंद घेत त्यामधे पर्यटक रमत आहेत.



तालुक्यातील या धरणाचे काम अमेरिकन अर्थ साह्याने १९८९ मध्ये झाले आहे या धरणाच्या पाण्यामुळे बोरघरहवेली, सोनसडे, कलमशेत, भानंग आदि गावांची पाण्याची तहान भागली आहे आजही या धरणात पाण्याचा साठा भरपूर असून अनेक गावांची पाण्याची तहान आजही भागवता येईल एवढे पाणी या धरणात आहे .

त्यामुळे हे धरण तळा तालुक्यासाठी जलसंजीवनीच आहे या धरणाचे पाणी हे वानस्ते , राणेचीवाडी , खैराटा , वावेहवेली , बामणघर , गौळवाडी, पिटसई भागात जात असल्याने या पाण्याचा ओलावा या जमिनीत असल्याने काही ठराविक शेतकरीच भातशेती करून भाताचे पिक घेत असल्याचे पहावयास मिळत आहे कालव्याची काही दुरूस्ती असल्यास ती दुरूस्ती व्हावी मात्र याच भागात गेल्या दोन तीन वर्षात कारले, भेंडी ,वांगी ,तोंडली , मिरची ,कलींगडाचे मोठ्या प्रमाणात पिक घेतले जात आहे. वावेहवेली धरणावरती पर्यटनाच्या दृष्टीने कोणत्याही सुविधा पाहिजे तशा मिळत नसल्या तरी धरण परिसर पर्यटकांनी शनिवार ,रविवार व सुट्टीच्या दिवशी फुल असतात त्याचबरोबर पावसाळ्यात धरणावरती मोठ्या प्रमाणात पर्यटक येत असतात. येथील निसर्ग व धबधबा हे पाहण्यासारखा असतो तसेच येथे वेगळा आनंद येथे मिळत असतो नोव्हेंबर पासून अनेक विद्यार्थ्यांच्या सहली येथे येण्यास सुरूवात झाल्याचे चित्र पहावयास मिळत आहे.

---

# पनवेल महानगरपालिका

## ता. पनवेल, जि. रायगड, पिन ४१० २०६

ई-मेल : panvelcorporation@gmail.com दुरध्वनी कार्यालय : ०२२-२७४५८०४०/४१/४२
pmc.townplanning@gmail.com वेबसाईट - panvelcorporation.com

**पनवेल महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक-२०२५**
**मतदान केंद्राच्या ठिकाणांची यादी प्रसिध्दीची**

**नोटीस सूचना**

मा. राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र यांचे कडील पत्र क्र. रानिआ/मनपा -२०२५/प्र.क्र.४१/का-५, दिनांक. ०९/१२/२०२५ च्या सुधारीत वेळापत्रका नुसार पनवेल महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक-२०२५-२६ करिता तयार करण्यात आलेल्या प्रभाग क्र. १ ते २० साठी ६६० मतदान केंद्राची यादी मा. राज्य निवडणूक आयोगाने अधिसुचित केलेल्या सुधारीत कार्यक्रमानुसार नागरीकांच्या माहितीसाठी दिनांक २०/१२/२०२५ रोजी मतदान केंद्राची यादी खालील ठिकाणी प्रसिध्द करण्यात येत आहे.

१) पनवेल महानगरपालिका मुख्यालय (निवडणूक विभाग)
२) महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर (www.panvelcorporation.com)
३) महानगरपालिकेची सर्व प्रभाग कार्यालय व उपविभाग नावडे
४) निवडणूक निर्णय अधिकारी यांचे कार्यालय

**जा.क्र.:-पमपा/जनसंपर्क./३१२५/**
**प्र.क्र. ७१८/७४७/२०२५**
**दिनांक :- १९/१२/२०२५**

**सही/-**
**आयुक्त**
**पनवेल महानगरपालिका**

---

# शिरगाव शाळेसाठी 'एक हात मदतीचा'

**मुरुड : प्रतिनिधी**

मुरुड तालुक्यामधील शिरगाव प्राथमिक शाळेत सिंगापूर इंटरनॅशनल स्कूलच्या शिक्षकांनी त्यांच्या विद्यार्थ्यांसहित भेट दिली. 'भारताचे खरे दर्शन खेड्यात घडते.' हे या विद्यार्थ्यांना सप्रमाण दाखवून, खेड्यातील होतकरू, गरजू विद्यार्थ्यांना मदत करण्यासाठी ही संपूर्ण टीम शाळेत दाखल झाली. पुढील तीन दिवस ही उच्चभ्रू वर्गातील मुले येथे श्रमदानासह कलाविष्कार सादर करणार आहेत.



येथील बागकाम, शाळेची संपूर्ण रंगरंगोटी, कलाविष्कार, काही भौतिक सुविधा यासह येथील विशेष गरजा असलेल्या विद्यार्थीनीच्या शिक्षणाची जबाबदारी उचलण्याचे अभिवचन देणाऱ्या या टीमचे तसेच येथील मुख्याध्यापक राजेंद्र नाईक, प्रियंका पाटील यांचे शिरगाव ग्रामस्थांसह मुरुडचे गटशिक्षणाधिकारी सुनील गवळी यांनी भरभरून कौतुक केले.

उद्घाटन सोहळ्यासाठी गटशिक्षणाधिकारी सुनील गवळी, विस्तार अधिकारी महेश कवळे, सुनील पाटील, केंद्रप्रमुख निलेश वारगे, चेतन पाटील, शिक्षण सल्लागार समिती सदस्य जगदीश चवरकर, सिंगापूर इंटरनॅशनल स्कूलचे प्रा गॅबरील फर्नांडिस, योगेश पाटील, ज्युडी फिशर, सौरभ मिश्रा, हुसेन भारमल, अजय मिश्रा, मिखिल जायस्वाल, जुनेद शेख, बाऊ जाधव, अविनाश चौहान यांसह विद्यार्थी प्रतिनिधी युवराज पाटील, शिरगाव गावचे अध्यक्ष जयवंत चवरकर, हरिश्चंद्र पाटील, जितेंद्र सातामकर, शाळा व्यवस्थापन अध्यक्ष प्रकाश पाटील यांच्यासह सिंगापूर इंटरनॅशनल स्कूल आणि शिरगाव शाळेचे विद्यार्थी तसेच ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

---

## बळीराजा शेतकरी गट स्थापन; १० लाखांचे प्रोत्साहनपर अनुदान

**तळा : प्रतिनिधी**

ग्रुप ग्रामपंचायत चरई खुर्द हद्दीत राष्ट्रीय नैसर्गिक शेती मिशन अंतर्गत बळीराजा शेतकरी गट स्थापन करण्यात आला आहे. या गटामध्ये ग्रामपंचायत चरई खुर्द अंतर्गत येणाऱ्या चरई खुर्द, बेलघर, खैराट, चरई गौळवाडी व तळघर येथील एकूण १३३ नोंदणीकृत शेतकऱ्यांचा सहभाग आहे.

या शेतकरी गटातील शेतकऱ्यांना शेती प्रोत्साहनपर अनुदान म्हणून एकूण १० लाख रुपये देण्यात येणार असून, सदर रक्कम चार टप्प्यांमध्ये थेट हस्तांतरित केली जाणार आहे. त्यापैकी पहिल्या टप्प्यातील २ लाख ५० हजार रुपये खात्यावर जमा करण्यात आले आहेत. उर्वरित अनुदानाची रक्कम पुढील तीन टप्प्यांमध्ये जमा केली जाणार आहे.

ग्रुप ग्रामपंचायत चरई खुर्दचे सरपंच प्रविण आंबार्ले यांनी शेतकऱ्यांनी भविष्यातील आरोग्याचा विचार करून सेंद्रिय व नैसर्गिक शेतीकडे अधिकाधिक सहभाग घ्यावा, असे आवाहन केले.

---

# ग्रुप ग्रामपंचायत उमरोली ता. पनवेल जि. रायगड

**निविदा सूचना** दि. २०/१२/२०२५

ग्रुप ग्रामपंचायत उमरोली यांजकडून जाहीर सूचना कळविण्यात येते की, ग्रुप ग्रामपंचायत उमरोली हद्दीतील भटक्या व मोकाट कुत्र्यांसाठी आश्रय स्थांन उभारणे. भटके व मोकाट कुत्रे पकडणे तसेच भटक्या व मोकाट कुत्र्यांचे आश्रय स्थानामध्ये देखभाल पोषण लसीकरण निब्रिजिकरण करणे करीता स्थानिक प्रशासन भारतीय प्राणीमंडळ यांचे प्राणी प्रजनन प्रतिबंध करिता नोंदणीकृत मान्यता प्राप्त संस्था / एन जीओ यांच्याकडून निविदा मागविण्यात येत आहेत. तरी इच्छूक अधिकृत प्राणी प्रजनन प्रतिबंध करीता नोंदणीकृत मान्यता प्राप्त संस्था / एन जिओ यांनी आपल्या निविदा ग्रुप ग्रामपंचायत उमरोली येथे दि. २०/१२/२०२५ ते २६/१२/२०२५ या कालावधी करीता दुपारी २.००. वाजेपर्यंत सादर करण्यात यावेत. सदरच्या निविदा दि. २६/१२/२०२५ रोजी संध्याकाळी ४.०० वाजता उघडल्या जातील.

उघडलेल्या निविदा स्वीकारणे किंवा नाकारणे याचा अधिकार मा. सरपंच ग्रुप ग्रामपंचायत उमरोली यांचा राहील.

| अ. क्र | कामाचे नाव | अंदाज पत्रकीय रक्कम | इसारा रक्कम १% | निविदा स्वीकारण्याची अंतिम तारीख | निविदा उघडण्याची तारीख |
|---|---|---|---|---|---|
| १ | ग्रुप ग्रामपंचायत उमरोली हद्दीतील भटक्या कुत्र्यांसाठी आश्रय स्थांन उभारणे | Animal welfare board of india यांनी निश्चित केलेले दर (प्रती श्वान) रक्कम रु.१९५०/- | ६०८/- | दि.२५/१२/२०२५ दुपारी २.०० वाजेपर्यंत | दि. २६/१२/२०२५ संध्याकाळी ४.०० वाजता |

**अटी व शर्ती**

१. स्थानिक प्रशासन भारतीय प्राणीमंडळ यांचे प्राणी प्रजनन प्रतिबंध करिता नोंदणीकृत संस्था यांनीच निविदा सादर करावी
२. सदर कामाची निविदा भरतेवेळी इच्छूक कंत्राटदाराने संपूर्ण कामाची माहिती घेवून निविदा सादर करावी
३. ग्रामपंचायत हद्दीतील भटकी व बेवारस कुत्री पकडून त्याची देखभाल करण्याची जबाबदारी ही ठेकेदारची राहील.
४. डॉग केनल मधील मोकाट असलेल्या कुत्र्यांची संपूर्ण जवाबदारी, जेवणाची व औषधोपचारची व्यवस्था करणे है ठेकेदारावर बंधनकारक राहील
५. डॉग केनल मधील मोकाट, बेवारस कुत्र्यांचे संगोपन व इतर व्यवस्था तसेच कालावधीनंतर पकडण्यात आलेली कुत्री सोडण्याची जबाबदारी ही ठेकेदारची राहील.
६. डॉग केनल मधील कुत्र्यांची संख्या GPS द्वारे सादर करणे ठेकेदारची जबाबदारी राहील.
७. Ministry of fisheries, animal husbandry and dairying यांचे कडून दिनांक ३०/०३/२०२३ रोजी जारी करण्यात आलेले Animal birth control rules २०२३ च्या नियमांचे पालन करणे बंधनकारक राहील.
८. स्थानिक संनियंत्रण समिति यांचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर देयके अदा करनेत येतील.
९. वरील निविदा मंजूर अथवा नामंजूर करण्याचा अधिकार खाली सही करणार यांनी राखून ठेवला आहे.

**सही/-**
**श्री. जगन्नाथ चां. चवरकर**
ग्रामपंचायत अधिकारी
ग्रुप ग्रामपंचायत उमरोली
ता. पनवेल. जि. रायगड.

**सही/-**
**सौ. बेबी कचिंद्र ठाकूर**
सरपंच
ग्रुप ग्रामपंचायत उमरोली
ता. पनवेल. जि. रायगड.

---

# भुवनेश्वर ते बारसोली रस्त्याची दुरूस्ती करण्याची मागणी



**धाटाव : प्रतिनिधी**

पर्यावरण,शेती यांसह समाजासाठी विविध पातळीवर संघटनात्मक काम करणाऱ्या, समाजाच्या हितासाठी चळवळ बनलेल्या बळीराजा फाऊंडेशन भुवनेश्वर ते बारसोली रस्त्याच्या दुरुस्तीसाठी आक्रमक झाली आहे.

वारंवार मागणी, तक्रारी करूनही रस्त्याची साईडपट्टी भरण्यात आली नाही, अनेक ठिकाणी रस्ता नादुरुस्त झाला आहे. यातून रस्ता खड्डे मुक्त व्हावा, दुतर्फा साईडपट्टी रस्त्याचा गवत काढावा, झाडे संवर्धन सुरक्षीत करावीत, साकाव दुरुस्त करावे, वरसे ग्रा.पं.त हद्दीतील गणेशनगर झोपडपट्टीतील रस्त्याचे खड्डे भरावेत, सर्वार्थाने रस्त्याची तातडीने दुरुस्ती करावी अशा आशायाचे निवेदन बळीराजा फाऊंडेशनच्या वतीने सार्व. बांधकाम विभागाचे उपविभागीय अभियंता विजय बागुल यांना शुक्रवारी दिले.

दरम्यान, रस्त्यातील खड्डे, साईटपट्टी भरणे, झाडांना सुरक्षीत करणे, साकाव दुरुस्तीबाबत प्रस्ताव प्रक्रिया करणे यावर उपविभागीय अभियंता विजय बागुल यांच्याशी सकारात्मक चर्चा झाली. रस्त्याची तातडीने दुरुस्ती केली जाईल असे ठोस अश्वासन त्यांनी दिले

---

**पनवेल येथिल मे. दिवाणी न्यायाधिश व. स्तर पनवेल यांचे न्यायालयात**

दिवाणी चौकशी अर्ज क. १७८८/२०२१
ने.ता. ०५/०१/२०२६
नि.क्र २०/ड

**जाहीर नोटीस**

श्रीमती. लता आंनद चव्हाण व इतर ३ .......... अर्जदार
विरूध्द
कोणीही नाही ......... जाबदार

सर्व लोकांना या नोटीसद्वारे कळविण्यात येते की,

**ज्यापेक्षा कै., आंनद श्रीपत चव्हाण यांचे दिनाक २४/१०/२०१६** रोजी **जे. जे. हॉसपटल, मुंबई** येथे मयत झाले असून अर्जदार प्रस्तुतचे अर्जदार कं. १ हयां पत्नी, अर्जदार कं. २ ते ३ हया मुली, व अर्जदार कं. ४ हा मुलगा असून त्यांचे कायदेशिर वारस आहेत. सदर वारस हे **वृदांवन को-ऑप-हौसिंग सोसायटी 'बी' फलॅट कं. ३०६, बी बिंग, प्लॉट कं. २९/४१, सेक्टर नं. ०९, खांदा कॉलनी, ता. पनवेल, जि. रायगड-४१०२०६** येथे राहत असून सदर मयताच्या नावे खालीलप्रमाणे मिळकत आहे. मिळकत आहे.

**मिळकत**

| अनु. क्र. | मिळकत |
|---|---|
| १. | वृदांवन को-ऑप-हौसिंग सोसायटी 'बी' फलॅट कं. ३०६, बी विंग, प्लॉट क्र. २९/४१, सेक्टर नं. ०९, खांदा कॉलनी, ता. पनवेल, जि. रायगड-४१०२०६ |

वरील अर्जदार हे मयत **कै. आंनद श्रीपत चव्हाण, यांचे वारस आहेत, या हक्कबद्दल कोणीही व्यकतीला हरकत असल्यास, त्यांनी सदर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून एक महिन्याच्या आत, या मे. कोर्टात हजर राहून हरकत घेतली नाही तर हे मे. कोर्ट वरील अर्जदार यांच्या अर्जा कामी पुरावा कार्यवाही करील.**

तसेच अर्जदार हे **कै. आंनद श्रीपत चव्हाण, यांचे वारस असल्याने शाबीत झाले तर त्यांस वारसादाखला मंजूर करील यांची दखल घ्यावी.**

आज दिनांक रोजी माझी सही न्यायालयाच्या शिक्क्यासह दिली.

कोर्टाचा शिक्का

**सही/-**
**सहाय्यक अधिशक ( प्रशासन)**
**दि.न्या. व स्तर. पनवेल**

---

## जाहीर नोटीस

**मा. न्यायाधिश, सहकारी न्यायालय, रायगड, रत्नागिरी, मु. अलिबाग यांचे न्यायालयात**
**(रायगड, रत्नागिरी जिल्हा)**

**मुकादमा क्रमांक/सी.सी./आर.जी.डी./१३६/२०२५**

**कमळ महिला नागरी सहकारी पतपेढी मर्यादित, पनवेल**
पत्ता : ६२६अे/७बी, श्रीकृष्ण निवास, रामदास मारूती मंदिराजवळ
टिळक रोड, पनवेल, रायगड ४१० २०६. } **वादी**

**विरूद्ध**

**१) सौ, रंजना रोहिदास मुंढे**
पत्ता मु. धाकटे वेणगाव, पो. वेणगाव,
ता. कर्जत, जि. रायगड, ४१०२०१.

**२) सौ. सुषमा विजय कुलकर्णी**
पत्ता : धाकटे वेणगाव, पो. वेणगाव,
ता. कर्जत, जि. रायगड, ४१०२०१

**३) सौ. नलिनी संतोष साळूंखे**
पत्ता: धाकटे वेणगाव, पो. वेणगाव
ता. कर्जत, जि- रायगड ४१०२०१ } **प्रतिवादी**

**दावा रुपये ५८,६४४/-**

ज्या अर्थी उपनिर्दिष्ट वादी यांनी दावा या न्यायालयात दाखल केला आहे. त्या अर्थी आपण आपली बाजू मांडण्यासाठी दि. २०/०१/२०२६ रोजी सकाळी/दुपारी ठिक ११.०० वाजता स्वत: जातीने सदर दाव्याबाबतीतील कागदपत्रासह हजर रहावे.

या नोटीसीअन्वये आपणास असे कळविण्यांत येते की, वर नमूद केलेल्या दिवशी व वेळी आपण हजर राहण्यास कसूर केल्यास आपल्या अनुपस्थितीत दाव्याची सुनावणी केली जाऊन त्याचा निर्णय केला जाईल.

त्याचप्रमाणे अशीही नोटीस देण्यात येते की, वर नमूद केलेल्या तारखेस अगर तत्पूर्वी सदर दाव्यातील हुकुमाची बजावणी करण्यासाठी आपला संपूर्ण पत्ता दाखल करण्यात कसूर केल्यास आपला बचाव रद्द समजण्यात येईल.

आज दि. १८/१२/२०२५ रोजी माझी सही व न्यायालयाची मुद्रा यासह दिले.

कोर्टाचा पत्ता : सहकार न्यायालय रायगड-रत्नागिरी, सहकार भवन

(रा.जि.प्रा. शिक्षक सह. पतसंस्था मर्या., अलिबाग कॅम्पस) दुसरा मजला, ब्राह्मण आळी, अलिबाग, एस.टी. स्टँडसमोर, मु.पो.ता. अलिबाग, जि. रायगड-४०२२०१.

सोबत लवाद दावा पाने

कोर्टाचा शिक्का

**सही/-**
**ज्युडिशियल क्लार्क**
**रायगड जिल्हा सहकारी न्यायालय, मु. अलिबाग**
**रायगड व रत्नागिरी जिल्हा**

---

**नमुना क्रमांक ३**

**जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायाधीश, पनवेल, जिल्हा रायगड**

**श्री. एस. आर. चव्हाण यांचे न्यायालयात**
**जिल्हा न्यायाधीश ४ व अतिरिक्त सत्र न्यायाधीश,**
**पनवेल-रायगड, पनवेल, रायगड.**

जातीने हजर राहण्याबाबत समन्स
(आज्ञावली ५, नियम ३)

विशेष विवाह अर्ज/२९/२०२४
अंकिता राहुल व्हावल उपाधी
अंकिता अंकुश दळवी वि.
राहुल रवींद्र वाव्हळ
पुढिल तारिख : २०-०१-२०२६

प्रति,

**राहुल रवींद्र वाव्हळ**
**खोली क्र. १०८, रुक्मिणी अपार्टमेंट, मनवेलपाडा रोड, कालीमाता मंदिराजवळ, कारगीर नगर, वसई, ठाणे- ४०१३०५**

ज्याअर्थी **अंकिता राहुल व्हावल उपाधी अंकिता अंकुश दळवी** यांनी तुमच्याविरुध्द बद्यल दावा दाखल केला आहे, म्हणून सदर दाव्याचा जबाब देण्यासाठी तुम्हाला याद्वारे २०-०१-२०२६ रोजी मध्यान्ह ११ वाजता या न्यायालयात जातीने हजर राहण्यासाठी बोलावण्यात येत आहे, व आपल्या बचावाच्या पुष्ट्यर्थ तुम्ही ज्यांचा आधार घेऊ इच्छिता असे सर्व दस्तऐवज त्या दिवशी हजर करण्याचा आदेश देण्यात येत आहे.

उपरोक्त दिवशी तुम्ही हजर न राहिल्यास तुमच्या गैरहजेरीत दाव्याची सुनावणी होऊन निर्णय देण्यात येईल याची दखल घ्यावी.

आज **१७/१२/२०२५** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

कोर्टाचा शिक्का

**सही/-**
**जिल्हा न्यायाधीश ४ व अतिरिक्त सत्र न्यायाधीश, पनवेल-रायगड**

( सूचना- तसेच तुम्हाला अशीही सूचना देण्यात येत आहे की, उपरोक्त दिनांकास किंवा तत्पूर्वी तुम्ही बजावणीसाठीचा पत्ता न दिल्यास तुमचा बचाव रद्य होण्यास पात्र ठरेल.)

ecourts.gov.in या संकेतस्थळावर पुढिल घडामोडींसाठी भेट द्या किंवा eCourts Services हे मोबाईल ॲप डाउनलोड करा

सदरहू कामगिरी संगणक प्रणाली मधुन अधिकृत वापरकर्त्याद्वारा निर्मित असल्यामुळे प्रत्यक्ष स्वाक्षरी केलेली नाही.

---

# महाराष्ट्र शासन

**महाड सार्वजनिक बांधकाम विभाग, महाड (रायगड)**
**Email :- mahad.ee@mahapwd.gov.in Ph. No. (02145) 222167**

**निविदा सूचना क्रमांक ४७ सन २०२५-२०२६**

कार्यकारी अभियंता, महाड (सा.बां.) विभाग, महाड, जिल्हा रायगड, पिन-४०२३०१, दूरध्वनीक्रमांक ०२१४५-२२२१६७ महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्याकडे योग्य त्या वर्गातील नोंदणी कृतकंत्राटदार यांचेकडुन खालील प्रमाणे बी-१ नमुन्यातील निविदा ई-निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) निविदा मागवित आहेत. निविदा कागदपत्रे शासनाच्या https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावरून डाऊनलोड करण्यात यावी. तसेच निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, महाड (सा.बां.) विभाग, महाड, जिल्हा रायगड, यांनी राखून ठेवला आहे.

| अ. क्र | कामाचे नाव | कामाची अंदाजित किंमत | इसारा/ बयाणा रक्कम | ई-निविदा संचाची किंमत | काम पूर्ण करण्याचा कालावधी | नोंदणी वर्ग |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| १ | वाकण रोहा खारी खाजणी रस्ता रा.मा. ९३ कि.मी. ४७/२५० ते ८७/६०० या रस्त्याची एक वर्षासाठी देखभाल व दुरूस्ती करणे. तालुका रोहा, जिल्हा रायगड. | २५१७१८५/- | २६०००/- | ५९०/- | १२ महिने | वर्ग पाच अ |
| २ | मुरूड रोहा कोलाड पुणे रस्ता प्रा.रा.मा. ५ कि.मी. ५४५/७५५ ते ५५९/६५५ या रस्त्याची एक वर्षासाठी देखभाल व दुरूस्ती करणे. तालुका रोहा, जिल्हा रायगड. | २२२९०९०/- | २३०००/- | ५९०/- | १२ महिने | वर्ग पाच अ |
| ३ | रा.मा. १७ ते कोलाड कामथ येरळ मार्ग प्राजिमा ७८ कि.मी. ०/०० ते १२/५०० रस्त्याची एक वार्षिक देखभाल व दुरूस्ती करणे, तालुका रोहा, जिल्हा रायगड | २१८४८७२/- | २२०००/- | ५९०/- | १२ महिने | वर्ग पाच अ |
| ४ | चिचवली ते आतोणे फाटा ते रा. मा १७ ते खांब नडवली, देवकान्हे, सांगडे, धामणसई, सोनगांव, पिंगळसई ते रा.मा. ९३ (अष्टामी) रस्ता प्राजिमा ८७ कि.मी. ०/०० ते २४/८०० रस्त्याची एक वार्षिक देखभाल व दुरूस्ती करणे तालुका रोहा, जिल्हा रायगड. | २०२९२३१/- | २२०००/- | ५९०/- | १२ महिने | वर्ग पाच अ |
| ५ | तांबडी सवाणे मोहरे रस्ता प्राजिमा ८० कि.मी. ११/०० ते २२/५०० या रस्त्याची वार्षिक देखभाल व दुरूस्ती करणे. तालुका रोहा, जिल्हा रायगड. | १७२२२०५/- | १८०००/- | ५९०/- | १२ महिने | वर्ग पाच अ |
| ६ | मौजे काटेतळी ता. पोलादपूर येथे सामाजिक सभागृह बांधणे. तालुका पोलादपूर, जिल्हा रायगड. | १६९३२७८/- | १७०००/- | ५९०/- | ०६ महिने | वर्ग पाच अ |
| ७ | मौजे लाखपाले ता. माणगांव येथे सामाजिक सभागृह बांधणे. जिल्हा रायगड. | १६८९९८९/- | १७०००/- | ५९०/- | ०६ महिने | वर्ग पाच अ |
| ८ | प्रा.रा.मा. ५ ते भुवनेश्वर निवी तळाघर वाशी विष्णूनगर किल्ला अशेकनगर रस्ता प्रा. जि.मा ७९ कि.मी. ०/०० ते ९/४०० रस्त्याची एक वार्षिक देखभाल व दुरूस्ती करणे. तालुका रोहा, जिल्हा रायगड. | १५१८८६०/- | १६०००/- | ५९०/- | १२ महिने | वर्ग पाच अ |
| ९ | रोहा तांबडी वाडी त तांबडी फाटा ते रा.मा. ९३ रस्ता प्राजिमा ५० कि.मी. ०/०० ते ४/८५० या रस्त्याची एक वार्षिक देखभाल व दुरूस्ती करणे. तालुका रोहा, जिल्हा रायगड. | १२६५८०१/- | १३०००/- | ५९०/- | १२ महिने | वर्ग सहा |
| १० | मुरूड शिघ्र गारंभी रस्ता प्राजिमा ५३ कि.मी. १५/०० ते १९/२०० या रस्त्याची वार्षिक देखभाल व दुरूस्ती करणे. तालुका रोहा, जिल्हा रायगड. | ११५७५१९/- | १२०००/- | ५९०/- | १२ महिने | वर्ग सहा |
| ११ | फल्याण वावे जांभुळ पाडा सुतारवाडी येरळ जामगांव पाथरशेत रस्ता ३८/८०० ते ५६/९७० रस्त्याची एक वार्षिक देखभाल व दुरूस्ती करणे. तालुका रोहा, जिल्हा रायगड. | १०९२११३/- | ११०००/- | ५९०/- | १२ महिने | वर्ग सहा |
| १२ | मौजे वहूर मावळतीवाडी मधली पार्टी ता. महाड येथे सामाजिक सभागृह बांधणे. तालुका महाड, जिल्हा रायगड. | १९३१११८/- | सु.बे.अ. | ५९०/- | ०६ महिने | सु.बे.अ. |
| १३ | मौजे रेपोली बौध्दावाडी येथे सामाजिक सभागृह वाढीव बांधकाम करणे. तालुका माणगांव, जिल्हा रायगड. | ६५३४५३/- | ७०००/- | ५९०/- | ०६ महिने | वर्ग सात |
| १४ | श्रीवर्धन लोणेरे रस्ता रा.मा. ९९ कि.मी. १७/०० ते १८/०० मध्ये रस्त्याची एक वर्षासाठी देखभाल दुरूस्ती करणे. तालुका म्हसळा, जिल्हा रायगड. | ५०६०८३/- | ६०००/- | ५९०/- | ०६ महिने | वर्ग सात |
| १५ | काळीज, ता. महाड बौध्दावाडी येथील बौध्दा विहिरासमोरील सभामंडप बांधणे. (अ.जा) तालुका महाड, जिल्हा रायगड. | ४२१४४४/- | ५०००/- | ५९०/- | ०६ महिने | वर्ग आठ |

**ई निविदेचे वेळापत्रक**

| | | |
|---|---|---|
| १ | निविदासंच डाऊनलोड व ऑनलाईन निविदा सादर करण्याचा दिनांक व वेळ | दिनांक **१९/१२/२०२५** (सकाळी १०.०० पासून) ते दिनांक **२६/१२/२०२५** वेळ १८.०० वाजेपर्यंत |
| २ | ऑनलाईनद्वारे तांत्रिक व आर्थिक देकार उघडण्याचा दिनांक व ठिकाण (शक्य असल्यास) | कार्यकारी अभियंता, महाड (सा.बां.) विभाग, महाड जिल्हा रायगड यांचे कार्यालयात **दि. २९/१२/२०२५** वेळ १०.०० वाजता |

**टिप :-** परिपूर्ण निविदा https//mahatenders.gov.in या संकेत स्थळावर पाहता किंवा विकत घेता येतील व ऑनलाईन निविदा सादर करता येतील. सदर निविदांचे सविस्तर वेळापत्रक, शुद्धीपत्रके तसेच इतर काही दुरुस्त्या, शर्ती व अटी या वरील संकेतस्थळांवरच पाहता येतील.

**जा.क्र.मवि/लेशा/निविदा/४७६०**
**दिनांक : १८/१२/२०२५**

**आरओसी/२०२५-२६/क्र.५/सी ४६७०**

**सही/**
**कार्यकारी अभियंता**
**महाड (सा.बां.) विभाग, महाड**

# नवी मुंबईमध्ये होर्डिंगविरोधात मोहीम

## महापालिकेने ७२ तासांत १८६७ बॅनर्स, १२० झेंडे हटविले

**नवी मुंबई : बातमीदार**

महानगरपालिकेची सार्वत्रिक निवडणूक ही दि. १५ जानेवारी २०२६ रोजी होत असून १५ डिसेंबर पासून आचार संहितेला सुरूवात झालेली आहे. आचार संहितेच्या अनुषंगाने राज्य निवडणूक आयोगाच्या आदेशानुसार ७२ तासांच्या कालावधीत अनाधिकृत बॅनर्स, पोस्टर्स, होर्डीग विरोधात धडक मोहीम हाती घेण्यात आली आहे. याअंतर्गत आठ विभागकार्यालय क्षेत्रात ७२ तासांत १००१ अनधिकृत बॅनर्स, ५७८ कटआउट / होर्डीग, २०४ पोस्टर्स, १२० झेंडे व ८४ भित्तीलेखन हटविण्यात आलेले आहेत.



त्याचप्रमाणे महानगरपालिकेच्या मालमत्तांसह शासकीय कार्यालये व इमारती तसेच सार्वजनिक व खाजगी जागांवरील राजकीय मजकूरही हटविण्यात आलेला आहे. याबाबतच्या कार्यवाहीचा आढावा महापालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांनी नोडल अधिकारी यांच्या आढावा बैठकीत घेतला. कायदा आणि सुव्यवस्थेबाबत पोलीस विभागाशी समन्वय राखून आवश्यक कार्यवाही करण्यासाठी अतिरिक्त आयुक्त डॉ. राहूल गेठे यांच्या सनियंत्रणाखाली कामकाज होणार असून निवडणूक कालावधीत व मतदान या करिता सुरक्षा आराखडा तयार करण्यात येत आहे.

निवडणूकीकरीता उमेदवार व पक्ष यांच्यामार्फत देण्यात येणा-या जाहिरात साहित्य तपासणी व प्रमाणपत्र देणे तसेच प्रसार माध्यमांचे निरीक्षण करणे त्याचप्रमाणे प्रसार माध्यमांना निवडणूक विषयक माहिती पुरविणे याकरिता मुख्य लेखा व वित्त अधिकारी सत्यवान उबाळे हे मिडीया सेल व एमसीएमसी समितीचे नोडल अधिकारी असून सदर कक्षाचे काम सुरु करण्यात आलेले आहे.

यावेळी चार सदस्यीय प्रभाग रचना असल्याने २८ प्रभागांपैकी २७ प्रभागांमध्ये एका मतदारास चार सदस्यांना आणि एका २८ क्रमांकाच्या प्रभागामध्ये ३ सदस्यांना मतदान करावयाचे आहे. या अनुषंगाने मतदान कार्यपध्दतीबाबत व्यापक जनजागृती करण्याकरिता विविध प्रसार माध्यमांचा उपयोग केला जाणार असून मतदार जनजागृती कामाकरिता उपआयुक्त डॉ. अजय गडदे हे नोडल अधिकारी आहेत.

### निवडणूक कामासाठी ६२७५ कर्मचारी

निवडणूक कामासाठी मतदान व मतमोजणी करीता ६२७५ कर्मचाऱ्यांची आवश्यकता असून ते उपलब्ध करुन घेण्यासाठी गतीमान कार्यवाही करण्याच्या सूचना मनुष्यबळ व्यवस्थापनाचे नोडल अधिकारी असणा-या प्रशासन विभागाचे उपआयुक्त किसनराव पलांडे यांना देण्यात आल्या.सर्व मतदान केंद्रे व निवडणूक निर्णय अधिकारी यांची कार्यालये जिओ टॅगिंग करुन घ्यावीत जेणेकरुन त्यांचे स्थळ सर्वांनाच लगेच समजेल असेही आयुक्तांमार्फत सूचित करण्यात आले.

# वाणिवली गावात प्लास्टिकबंदी

## जनजागृती रॅली, कापडी बॅगचे वाटप




**मोहोपाडा : प्रतिनिधी**

रसायनी पाताळगंगा येथील रॉयल कार्बन ब्लॅक प्रा. लिमिटेड आणि पाताळगंगा नदी आणि पर्यावरण संवर्धन चॅरिटेबल ट्रस्ट तसेच पिल्लई एच.ओ. सी. महाविद्यालय, रसायनी मोहापाडा यांच्या संयुक्त विद्यमानाने वाणिवली गावामध्ये प्लास्टिक बंदी जनजागृती रॅली काढण्यात आली.

या जनजागृती रॅलीद्वारे नागरिकांमध्ये प्लास्टिक वापराचे दुष्परिणाम, पर्यावरण संरक्षणाचे महत्त्व व स्वच्छतेबाबत जागरूकता निर्माण करण्यात आली. रॅलीनंतर ग्रामस्थांना कापडी बॅगचे वाटप करण्यात आले तसेच गावातील व सार्वजनिक ठिकाणी साफ-सफाई मोहीम राबविण्यात आली.या उपक्रमात रॉयल कार्बन ब्लॅक प्रा. लि. चे कंपनी प्रशासन, पाताळगंगा नदी आणि पर्यावरण संवर्धन चॅरिटेबल ट्रस्ट चे पदाधिकारी तसेच पिल्लई कॉलेज, रसायनी मोहापाडा येथील शिक्षक व विद्यार्थी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

पर्यावरणाचे संरक्षण, पाताळगंगा नदीचे संवर्धन आणि प्लास्टिकमुक्त समाज घडविण्यासाठी अशा प्रकारचे उपक्रम सातत्याने राबविण्याचा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला.

नागरिकांनीही या मोहिमेला उत्स्फूर्त प्रतिसाद देत प्लास्टिकचा वापर टाळण्याचा संकल्प केला. पर्यावरण रक्षणासाठी उद्योग, शैक्षणिक संस्था व सामाजिक संघटनांचा संयुक्त सहभाग ही काळाची गरज असून वाणिवली गावात राबविण्यात आलेला हा उपक्रम त्याचे उत्तम उदाहरण ठरला आहे.

# तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शनात श्रीमती भागुबाई चांगू ठाकूर शाळेचे यश



**उरण : वार्ताहर**

उरण तालुका दोन दिवसीय ५३ व्या तालुका स्तरीय विज्ञान प्रदर्शनात जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या श्रीमती भागुबाई चांगू ठाकूर शाळेने नेत्रदीपक यश मिळवले. यावेळी विकसित भारत आणि आत्मनिर्भर भारतासाठी STEM विषयांतर्गत विविध गटांमधील स्पर्धेत व प्रदर्शनात शाळेने यश मिळवले.

इ ६ वीमधील जविका विनय भोईर हिने वक्तृत्त्व स्पर्धेत तृतीय क्रमांक पटकावला तसेच प्रकल्प मांडणी मध्ये ६वी ते ८वी गटात प्रथम क्रमांक मिळवला. पुढील जिल्हा स्तरावर तिची निवड करण्यात आली . तसेच माध्यमिक शिक्षक गटामधून शाळेतील गणित विषयाच्या शिक्षिका शुभांगी म्हात्रे यांनी द्वितीय स्थान मिळवले. प्रयोगशाळा परिचर या गटामधून कृतिका कोळी यांनी प्रथम क्रमांक मिळवून जिल्हास्तरासाठी पात्र ठरल्या.

अशा चतुःस्तरीय यशासाठी शाळेचे चेअरमन चंद्रकांत घरत व शाळेचे कमिटी मेंबर पालक, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी वर्ग यांनी विजेत्यांचे,त्यांना मार्गदर्शन करणार्या शिक्षकांचे तसेच शाळेच्या मुख्याध्यापिका अनुराधा काठे यांचे कौतुक व अभिनंदन केले.

# जीवनगौरव पुरस्कार देऊन 'कोमसाप'ने नवी ऊर्जा दिली -कवयित्री वसुधा नवाळी

**उरण : बातमीदार, वार्ताहर**

माझ्या ८७ व्या वर्षी मी कार्यक्षेत्रात केलेल्या काव्य लेखनाची दखल घेऊन एक ज्येष्ठ कवयित्री या नात्याने मला जीवन गौरव पुरस्काराने सन्मानित केले त्यामुळे भविष्यात काव्यलेखन करण्याची ऊर्जा कोमसाप उरणने दिली आहे असे विचार ज्येष्ठ कवयित्री वसुधा नवाळी यांनी मधुबन कट्ट्यावरील कविसंमेलनात काढले

.यावेळी दुसरे जीवनगौरव पुरस्कार प्राप्त व्यक्तिमत्त्व गायक कवी रमेश थवई यांनी ही आपल्या भाषणात कोमसापच्या कार्याचा गौरव करून,केलेल्या सत्काराबाबत आभार मानले. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी सुरेश मेस्त्री होते.प्रमुख उपस्थितीत साहित्यरत्न प्रा.एल.बी. पाटील,तालुका शिक्षण



ग.शिक्षणाधिकारी निर्मला घरत, मच्छिंद्र घरत,सूर्यकांत दांडेकर, चंद्रकांत मुकादम,निळवर्ण दत्ताराम, साहेबराव ओहोळसर,मधुबन कट्टा अध्यक्ष राम म्हात्रे,आर. सी. गावंड,नरेश ठाकूर इत्यादींची प्रमुख उपस्थिती होती.प्रास्ताविक मच्छिंद्र म्हात्रे तर सुरेख सूत्रसंचालन संजय होळकर यांनी केले.हा कार्यक्रम विमलातलाव उरण येथे मोठया उत्साहात झाला.

म्हणींवर माझी कविता या विषयावरील कविसंमेलनात भरत पाटील,रमण पंडित, रामचंद्र म्हात्रे, संजीव पाटील, संपदा ठाकूर,वसुधा नवाळी, मारुती तांबे, शिवप्रताप पंडित, म.का.म्हात्रे,नरेश पाटील, संग्राम तोगरे,प्रा एल बी.इत्यादीं कवींनी सादर केल्या

# धुतूम येथील इंडियन ऑईल टॅकिंग कंपनीने थकविले ५४७ कोटी

## सात दिवसांत थकबाकी भरण्याचे सिडकोचे आदेश

**उरण : प्रतिनिधी**

उरण तालुक्यातील धुतूम येथील द्रोणगिरी नोड मधील इंडियन ऑईल टॅकिंग लिमिटेड कंपनीला भुईभाड्यापोटी थकविलेल्या ५४७ कोटी रुपये सात दिवसात भरण्याचे आदेश सिडकोने दिले आहेत. मुदतीत रक्कम न भरल्यास कायदेशीर कारवाई करण्याचा इशाराही सिडकोने कंपनीला नोटीसीव्दारे दिला आहे.

धुतूम ग्रामपंचायतीच्या हद्दीतील द्रोणागिरी नोड मधील सेक्टर -१ मधील प्लॉट क्र. १०१ वर इंडियन ऑईल टँक प्रकल्प आहे.धुतुम ग्रामपंचायतीच्या हद्दीत असलेल्या या प्रकल्पातून १९९६ पासून जेएनपीए बंदरातून परदेशातून आयात करण्यात येणाऱ्या तेलजन्य पदार्थांची साठवणूक करणाऱ्या लाखो किलो लिटर्सच्या टाक्या आहेत.

या प्रकल्पांसाठी सिडकोने द्रोणागिरी नोड मधील सेक्टर -१मधील प्लॉट क्रमांक १०१ वरील भुखंड १७ ऑक्टोंबर १९९६ साली भुईभाड्याने दिलेला आहे, मात्र तेव्हापासून भाड्याने दिलेल्या भुखंडाचे भाडे भरण्यात



सातत्याने दिरंगाईच चालविली होती.

क़ंपनीच्या अनागोंदी कारभारामुळे शासनाचा अतोनात महसूल बुडत असल्याने रांजणपाडा-उरण येथील रहिवासी सामाजिक कार्यकर्ते राम दशरथ पाटील यांनी सिडको, जिल्हाधिकारी, तहसीलदार यांच्याकडे अनेकदा तक्रारी केल्या आहेत. मागील १५ वर्षांपासून तक्रारीतुन कंपनीने आराखड्याप्रमाणे बांधकाम केले नसल्याचे व बांधकामाला ओसीही दिलेली नाही.

# टिळक स्कूलचा क्रीडा महोत्सव साजरा

**नवी मुंबई : बातमीदार**

टिळक पब्लिक स्कूल, नेरुळ यांनी अत्यंत उत्साहात आपला २० वा वार्षिक क्रीडा व सांस्कृतिक दिवस साजरा केला. मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन आणि मंगल वंदनेने कार्यक्रमाचा शुभारंभ झाला. भव्य संचलन ,मशाल प्रज्वलन आणि शपथविधी यांच्या माध्यमातून क्रीडा दिनाची औपचारिक घोषणा करण्यात आली.

उद्घाटनात्मक सांस्कृतिक कार्यक्रमाने प्रेक्षकांना मंत्रमुग्ध केले. त्यानंतर टिळक ग्रुप ऑफ स्कूल्स अँड कॉलेजेसचे संचालक डॉ. अजीत कुरुप यांनी मार्गदर्शन केले. शिशु वर्ग ते इयत्ता



बारावीपर्यंतच्या विद्यार्थ्यांनी विविध क्रीडा स्पर्धांमध्ये चपळता आणि स्पर्धात्मकता दाखवली. सांस्कृतिक सादरीकरणांमध्ये हॉकी ड्रिल, पॉम-पॉम डान्स, साडी ड्रिल आणि फुटबॉल डान्स यांचे सादरीकरण विशेष आकर्षण ठरले.

मुख्य पाहुणे माजी राष्ट्रीय विजेते व खेळाडू सबिनो फर्नांडिस यांनी खेळांचे परिवर्तनशील महत्त्व अधोरेखित केले आणि विद्यार्थ्यांना शिस्त व प्रामाणिकतेसह उत्कृष्टतेचा पाठपुरावा करण्याची प्रेरणा दिली. प्राचार्या श्रीमती भुवनेश्वरी राजशेखर यांनी वार्षिक अहवाल सादर करुन विद्यार्थ्यांचे कौतुक केले.

# सानपाडा ज्येष्ठ नागरिक संघातर्फे आरोग्य तपासणी शिबिर

**नवी मुंबई : बातमीदार**

फेस्कॉन प्रादेशिक विभागाच्या ४५ व्या वर्धापन दिनानिमित्त सानपाडा ज्येष्ठ नागरिक संघाच्यावतीने डी. वाय. पाटील हॉस्पिटलतर्फे १८ डिसेंबर २०२५ रोजी संघाच्या कार्यालयात ज्येष्ठ नागरिकांसाठी झालेल्या मोफत आरोग्य तपासणी शिबिराचे उद्घाटन डॉ. निखिल यांच्या हस्ते झाले.

सुरुवातीला सर्व डॉक्टर व सहकारी कर्मचाऱ्यांचे पुष्पगुच्छ आणि गुलाब पुष्प देऊन स्वागत करण्यात आले. संघाचे अध्यक्ष मारुती विश्वासराव यांनी प्रास्ताविक केले. या आरोग्य तपासणी शिबिरामध्ये मधुमेह, रक्तदाब, डोळे तपासणे,



त्वचारोग, कान नाक घसा तपासणी, ईसीजी, हाडाची तपासणी, इत्यादी आजारांच्या तपासण्या करून मोफत औषधे देण्यात आली. शिबिरामध्ये डॉ. यश, डॉ. मुदिता, डॉ. पलख, डॉ. प्रज्ञेश, डॉ. आदिती, डॉ. शिवानी व हॉस्पिटलचे इतर कर्मचाऱ्यांचा महत्त्वाचा सहभाग होता. डी. वाय. पाटील हॉस्पिटलचे मेडिकल सोशल वर्कर समाधान माळी यांनी केलेल्या सहकार्याबद्दल त्यांना संघाच्या वतीने धन्यवाद देण्यात आले.

या शिबिरामध्ये जवळजवळ १०० ज्येष्ठ नागरिकांनी सहभाग घेऊन शिबिराचा लाभ घेतला. याप्रसंगी संघाचे सचिव जगदीश एकावडे, खजिनदार महादेव पाटील, सहसचिव राजेंद्र कदम, उपाध्यक्ष सीमा बोराडे, लक्ष्मण गोळे, कमिटी मेंबर जगन्नाथ देसाई, मंगला मानधने, राजाराम घोलप तर माजी पदाधिकारी राम काजरोलकर, मारुती कदम,विठ्ठल गव्हाणे, विष्णुदास मुखेकर, बळवंत पाटील, सुभाष बारवाल, सेवानिवृत्त माहिती संचालक देवेंद्र भुजबळ उपस्थित होते.

# ब्युटी पेजंट स्पर्धेत झळकले सौंदर्यवतींचे ग्लॅमर

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

साहस फाउंडेशन या संस्थेने एस एस सीनेव्हिजन आणि श्री प्रह्लादराय झुलेलाल ट्रस्टच्या साहाय्याने ब्युटी पेजंट-महाराष्ट्राची सौंदर्यवती २०२५, सिंधी पंचायत हॉलमध्ये आयोजित करण्यात आला.

कार्यक्रमाचे उदघाटन रसायनीतील साहस फाउंडेशनच्या अध्यक्षा रेश्मा कुरूप, झुलेलाल ट्रस्टचे ऍडव्होकेट मनोहर इस्टचे डिव्होकेट मनोहर भोईर व इतर मान्यवर यांनी द्वीप प्रज्वलन करून केले.या ब्युटी पेजन्टचे वैशिष्ट्य म्हणजे हे ब्युटी पेजन्ट लहान मुलं मुली, मिसेस व मिस बरोबर स्पेशली एबल्ड चाईल्ड ह्यांनासुद्धा समाविष्ट करण्यात आला होता.

अध्यक्षा रेश्मा कुरूप यांनी यावेळी माहिती दिली कि सौंदर्य



स्पर्धांमध्ये व्यासपीठ उपलब्ध करून देऊन आम्ही एक संस्था म्हणून या मुलांनासुद्धा सामान्य मुलांबरोबर व्यासपीठ देऊन त्यांचा मनोबल वाढवण्याचा प्रयत्न केला आहे. या कार्यक्रमामुळे त्यांना स्पर्धा करण्याची आणि त्यांची प्रतिभा आणि टॅलेंट प्रदर्शित करण्याची संधी मिळाली तसेच विजेत्या स्पर्धकांना मलाबार ज्वेलर्सकडून चांदीचे कॉइन व व्हिएलसीसी कडून गिफ्ट देण्यात आले.

कार्यक्रमाचे मुख्य अतिथी म्हणून सिनेस्टार संजय खापरे होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आर जे कोमल व कोरिओग्राफी एक्टरेस स्वप्नाली केलजी व अभिनेते देवदत्त घरत ह्यांनी केले तर एकूण ६५ स्पर्धकांनी या स्पर्धामध्ये भाग घेतला. महाराष्ट्राची सौंदर्यवती मिसेस विजेतेपद मानसी सुर्वे (५०+ वयोगट), महाराष्ट्रची सौंदर्यवती मिसेस विजेतेपद हर्षला कारंडे, महाराष्ट्रची सौंदर्यवती मिसेसचे विजेतेपद पूजा भांडारकर व इतर स्पर्धकांना फॅशन आयकॉन, फोटोजेनिक फेस अशा वेगवेगळे टायटल्स देऊन स्पर्धकांना क्राऊन आणि ट्रॉफी देऊन सन्मानित करण्यात आला.

विजेत्यांची निवड कामोठे येथील आदी मॅटर्निटी हॉस्पिटल व स्किन क्लिनिकचे डायरेक्टर डॉ शीतल गोसावी, एक्टरेस अर्चना पवार व स्वाती सोनावणे ह्यांनी केले. या कार्यक्रमात मोहिनी विक्रांत पाटील, भूषण पोवळे, महादेव घरत, उद्योजिका रेश्मा भोईर, उद्योजिका माधवी भोईर व मान्यवर उपस्थित होते.

यावेळी प्रीतम म्हात्रे ह्यांचा विशेष सहकार्य होता. तसेस साहस फौंडेशनचे मेंबर अनघा गोळे, शीतल आंबेरकर, अनविका, अजिंक्य ह्याचे विशेष सहकार्य लाभले.

# बी.एस. पाटील इंग्लिश मीडियम स्कूलमध्ये फॅन्सी ड्रेस स्पर्धेला प्रतिसाद

**उरण : वार्ताहर**

बी. एस. पाटील इंग्लिश मीडियम स्कूलमध्ये नुकतीच चिमुकल्या विद्यार्थ्यांसाठी रंगतदार फॅन्सी ड्रेस स्पर्धा आयोजित करण्यात आली. या स्पर्धेत नर्सरी, ज्युनिअर केजी आणि सीनियर केजीच्या विद्यार्थ्यांनी उत्साहाने सहभाग घेतला. नर्सरीतील विद्यार्थी फळांच्या वेशात, ज्युनिअर केजीतील विद्यार्थी प्राण्यांच्या वेशात, तर सीनियर केजीतील विद्यार्थी फुलांच्या वेशात सजले होते.

संस्थेचे संस्थापक अध्यक्ष कैलास पाटील यांनी कार्यक्रमाला उपस्थित राहून विद्यार्थ्यांचा उत्साह वाढवला. अशा उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास आणि स्टेजवरील सादरीकरण कौशल्य



विकसित होते, असे त्यांनी नमूद केले.

स्पर्धेत नर्सरीमधील प्रिंसिका कोळी, रिदान कासकर, प्रिन्स नवले, अश्वा नवाले, अनन्य पाटील, शर्व शेलके, आयान पाटील, सार्थ घरत, आर्य माळी; ज्युनिअर केजीमधील क्रियांश नवाले, क्रिशा ठाकूर, समप्रिती पाटील, श्रीजा जोशी, मायरा चिट्टमपल्ले, मितांश पाटील, शौर्य पाटील, शौनक पाटील, प्रिन्स गडरी, गोविंद भाटी, प्रिशा ताम्राकर, आराध्य थळी; तसेच सीनियर केजीमधील मोक्षा जोशी, सायरा घरत, हर्षिता जैसवाल, दुर्गा भाटी, वर्षा देवाशी यांनी आपल्या सादरीकरणाने प्रेक्षकांची मने जिंकली.

# मतमोजणीसाठी प्रशासन सज्ज

## रोहा अष्टमी नगर परिषद निवडणूक निकालाच्या पार्श्वभूमीवर तयारी

**रोहा : प्रतिनिधी**

रोहा अष्टमी नगर परिषदेच्या मतमोजणीसाठी प्रशासन सज्ज झाला आहे. रोहा अष्टमी नगर परिषदेच्या मतमोजणी ही प्रक्रिया शांततेत पार पाडण्यासाठी सहकार्य करण्याचे आवाहन निवडणूक अधिकारी तथा तहसीलदार किशोर देशमुख यांनी केले आहे.




येत्या २१ तारखेला होत असलेल्या मतमोजणी प्रक्रियेसंदर्भात रोहा ज्येष्ठ नागरिक सभागृहात आयोजित बैठकीत पोलीस निरीक्षक मारुती पाटील, नायब तहसीलदार राजेश थोरे, नायब तहसीलदार पुंडलिक मोकल, नायब तहसीलदार वैशाली काकडे, रोहा अष्टमी नगर परिषदचे अधिकारी निवास पाटील यांच्यासह मतमोजणीसाठी नियुक्त करण्यात आलेल्या अधिकारी, कर्मचारी आदी उपस्थित होते.

या वेळी निवडणूक निर्णय अधिकारी डॉ.किशोर देशमुख यांनी उपस्थित झोनल अधिकारी व कर्मचाऱ्यांकडून मतमोजणी संदर्भात माहिती जाणून घेतली व मार्गदर्शन केले. रविवारी सकाळी १० वा. मतमोजणी प्रक्रिया सुरु केली जाईल. मतमोजणी सुरु होण्यापूर्वी केंद्रात संबधित उमेदवार आणि मतमोजणी प्रतिनिधी यांनाच प्रवेश दिला जाईल. प्रत्येक वेळी २ प्रभागातील मतमोजणी होणार असून मतमोजणीच्या एकूण ५ फेऱ्या होणार आहेत. सर्व मतमोजणी प्रक्रियासाठी ३५ अधिकारी व कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहेतसेच मतमोजणीसंदर्भात माहिती मिळावी म्हणून मतमोजणी केंद्राबाहेर उभे असणाऱ्या सर्वपक्षीय कार्यकर्ते व नागरिकांना या मतमोजणी संदर्भात भोंग्यांद्वारे प्रत्येक टेबल आकडेवारी व इतर माहिती देण्यात येईल. सर्व मतमोजणी कार्यक्रम शांततेत पार पाडावे असे आवाहन निवडणूक निर्णय अधिकारी डॉ. देशमुख यांनी केले आहे.

या वेळी मतदान प्रक्रिया या संबंधित उपस्थितांना त्यांनी मार्गदर्शन केले. मतमोजणी ठिकाणी अधिकारी ८ वाजता येणार असुन १० वाजता मतमोजणी सुरु होणार आहे. मतमोजणी ठिकाणी पत्रकारांसाठी कक्ष तयार करण्यात आला आहे, अशी माहिती देशमुख यांनी दिली

कोणताही अनुचित प्रकार होऊ नये यासाठी पोलिसांचा चोख बंदोबस्त राहाणारे आहे. यामध्ये मतमोजणी केंद्र, राम मारुती चौक, भाटे वाचनालय सह अन्य शहरांतील महत्त्वाच्या ठिकाणी पोलिस बंदोबस्त असणार असल्याचे पोलीस निरीक्षक मारुती पाटील यांनी सांगितले.

मतमोजणीच्या निमित्ताने रोहा पोलीस ठाण्याच्या वतीने तैनात करण्यात आलेल्या बंदोबस्तामध्ये पोलीस उपविभागीय अधिकारी प्रसाद गोकुळे, पोलीस निरीक्षक मारुती पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली ३ सहायक पोलीस निरीक्षक, ६ उपनिरीक्षक, ८० अंमलदार व एकस्ट्रयकींग फोर्स सज्ज करण्यात आले आहे.

## टाटा पॉवर कंपनीविरोधातील उपोषण स्थगित

**कर्जत : प्रतिनिधी**

स्थानिकांच्या मागण्यांसाठी कर्जत तालुक्यातील भिवपुरी कॅम्प परिसरात टाटा पॉवर कंपनीच्या १००० मेगावॅट प्रकल्पाविरोधात सुरू करण्यात आलेले बेमुदत उपोषण कंपनी प्रशासनाच्या लेखी आश्वासनानंतर स्थगित करण्यात आले.

सुरुवातीला दोन वेळा कंपनी प्रशासनाने भेट देऊन आंदोलन मिटत नव्हते. अखेर रात्री १० वाजता आंदोलन चिघळणार अशी परिस्थिती निर्माण होत असताना दिवसभर चाललेल्या तीव्र आंदोलनानंतर रात्री उशिरा ११ वाजता प्रशासनाने मागण्या लेखी मान्य केल्या. त्यानंतर उपोषण मागे घेण्यात आले.

१५ दिवसांत मागण्यांची प्रत्यक्ष अंमलबजावणी झाली नाही, तर पुन्हा आंदोलन छेडले जाईल, मात्र त्यावेळी आंदोलनाचे स्वरूप अधिक तीव्र असेल, असे आंदोलनकर्त्यांनी स्पष्ट केले आहे.

## मोबाईल पाहण्यावरून वाद; नवऱ्याची बायकोला मारहाण

### कर्जत तळ्याचीवाडीतील प्रकार, गुन्हा दाखल

**नेरळ : प्रतिनिधी**

मोबाईल पाहण्यावरून सुरू झालेला घरगुती वाद थेट हिंसाचारात बदलल्याची घटना कर्जत पोलीस ठाणे हद्दीतील तळ्याचीवाडी (पो. कडाव) येथे घडली आहे. या वेळी रागाच्या भरात पतीने पत्नीवर वीट फेकून मारहाण केली. या प्रकरणी कर्जत पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.




१६ डिसेंबर २०२५ रोजी सायंकाळी सुमारे ५ वाजण्याच्या सुमारास ही घटना घडली. फिर्यादी महिला घरात बसून मोबाईलवर कापडाचे डिझाईन पाहत असताना, आरोपी पतीने मोबाईल का बघतेस, मला दे, असे म्हणत वाद सुरू केला. त्यावर पत्नीने, तुम्ही रात्रभर मोबाईल बघत होता, मला थोडा वेळ डिझाईन पाहू द्या, असे उत्तर दिल्याने पतीच्या रागाचा पारा चढला.

या किरकोळ कारणावरून आरोपी पतीने पत्नीला शिवीगाळ व दमदाटी केली. एवढ्यावर न थांबता, घराच्या पायरीवर रचून ठेवलेल्या विटांपैकी एक वीट उचलून पत्नीच्या दिशेने फेकली, ज्यामुळे तिला दुखापत झाली.

या घटनेबाबत कर्जत पोलीस ठाण्यात गुन्हा रजिस्टर नं. ३३६/२०२५ भारतीय न्याय संहिता २०२३ अंतर्गत कलम ११८(१), ११५(२), ३५१(२), ३५२ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस हवालदार. हनुमंत गायकवाड करीत आहेत.

मोबाईलसारख्या किरकोळ कारणावरून घरात हिंसाचार घडत असल्याने, कुटुंबातील वाढती असहिष्णुता आणि महिलांच्या सुरक्षिततेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे.



**पाली : भाजपचे नेते प्रकाश देसाई यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा देताना रोहा तालुका सरचिटणीस आनंद लाड, क्रीडा संयोजक शेखर गोळे, नागोठणे शहर सरचिटणीस तिरत पोलसानी, शिक्षण सेल तालुका उपाध्यक्ष धनराज उमाळे व इम्रान पानसरे.**

## अंजुमन इस्लाम डिग्री कॉलेज येथे आरोग्य, नेत्र तपासणी व रक्तदान शिबिर

**मुरुड : प्रतिनिधी**

अल्पसंख्याक दिनाचे औचित्य साधून तसेच डॉ. द्वारकानाथ वामन कर्णिक यांच्या स्मृतिदिनानिमित्त प्राचार्य डॉ. साजिद शेख यांच्या मार्गदर्शनाखाली लायन्स क्लब ऑफ मुरुड-जंजिरा व लायन्स क्लब ऑफ श्रीबाग यांच्या यांच्या संयुक्त विद्यमाने अंजुमन इस्लाम जंजिरा डिग्री कॉलेज ऑफ सायन्स, मुरुड-जंजिरा येथे मोफत आरोग्य तपासणी, नेत्र तपासणी, मोतीबिंदू तपासणी तसेच रक्तदान महाशिबिराचे आयोजन करण्यात आले.



या कार्यक्रमास महाविद्यालयाचे चेअरमन जैनुद्दीन कादरी, सदस्य इस्माईल शेख व तौसिफ़ फत्ते, लायन्स इंटरनॅशनल रायगडचे जिल्हा गव्हर्नर संजीव सूर्यवंशी, विजय गणात्रा, आर.पी. पांडे, नमिता मिश्रा, अलोक मिश्रा, विजय वनगे, लायन्स क्लब मुरुडचे अध्यक्ष सनी सोगावकर, मकरंद कर्णिक तसेच माजी तहसीलदार नयन कर्णिक व नैनिता कर्णिक, लायन्स क्लब पोयनाडचे अध्यक्ष गुरुनाथ माळी आदी उपस्थित होते. मान्यवरांनी अल्पसंख्याक दिनाच्या शुभेच्छा व्यक्त करून आपले विचार सर्वांसमोर मांडले.

या महाशिबिराच्या यशस्वी आयोजनासाठी तेरणा स्पेशालिटी हॉस्पिटल अँड रिसर्च सेंटर, नेरूळ-नवी मुंबई येथील मार्केटिंग मॅनेजर रवींद्र कदम, तज्ज्ञ डॉक्टर डॉ. अजितराव जाधव तसेच जिल्हा रुग्णालयाच्या रक्तपेढीचे डॉ. दीपक गोसावी व त्यांची टीम यांचे विशेष सहकार्य लाभले. या उपक्रमास परिसरातील नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. या शिबिरात एकूण १२० नागरिकांची नेत्र तपासणी, १०० नागरिकांची आरोग्य तपासणी तसेच ६२ रक्तदात्यांनी रक्तदान केले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी डॉ. फिरोज शेख यांनी सहकार्य केले.

## अनधिकृत, विनातिकीट प्रवास करणाऱ्यांविरुद्ध कारवाई

**रोहा : प्रतिनिधी**

प्रवाशांना सुरक्षित, सुरळीत आणि आरामदायी प्रवासाचा अनुभव देण्याच्या आपल्या वचनबद्धतेतून मध्य रेल्वेने आपल्या मार्गावर अनधिकृत व विनातिकीट प्रवासाला आळा घालण्यासाठी प्रयत्न अधिक तीव्र केले आहेत. तिकीट तपासणी मोहिमा अधिक प्रभावी व नियोजनबद्ध पद्धतीने राबवून मध्य रेल्वेने आर्थिक वर्ष २०२५-२६ (एप्रिल ते नोव्हेंबर २०२५) या कालावधीत महत्त्वपूर्ण परिणाम साधले आहेत.



आर्थिक वर्ष २०२५-२६ दरम्यान मध्य रेल्वेच्या समर्पित तिकीट तपासणी पथकांनी विनातिकीट, अयोग्य, अवैध प्रवास अधिकारासह प्रवास करणाऱ्या २७.५१ लाख प्रवाशांना पकडले, तर आर्थिक वर्ष २०२४-२५ मध्ये ही संख्या २५.०८ लाख इतकी होती. म्हणजेच सुमारे १०% वाढ नोंदविण्यात आली आहे.

आर्थिक वर्ष २०२५-२६मध्ये दंडाच्या स्वरूपात विक्रमी १६४.९१ कोटी रुपये वसूल करण्यात आले, तर आर्थिक वर्ष २०२४-२५मध्ये १३८.४४ कोटी रुपये वसूल झाले होते. म्हणजेच १९% पेक्षा अधिक वाढ झाली आहे.

नोव्हेंबर २०२५ या महिन्यात मध्य रेल्वेच्या तिकीट तपासणी पथकांनी विनातिकीट, अयोग्य अथवा, अवैध प्रवास अधिकारासह प्रवास करणाऱ्या ३.७४ लाख प्रवाशांना पकडले, तर नोव्हेंबर २०२४मध्ये ही संख्या २.९८ लाख इतकी होती. म्हणजेच २५%पेक्षा अधिक वाढ नोंदविण्यात आली आहे.

नोव्हेंबर २०२५ महिन्यात दंडाच्या स्वरूपात २३.६३ कोटी रुपये वसूल करण्यात आले, तर नोव्हेंबर २०२४मध्ये १४.०८ कोटी रुपये वसूल झाले होते. म्हणजेच जवळपास ६८% वाढ झाली आहे.

आर्थिक वर्ष २०२५-२६साठी (एप्रिल ते नोव्हेंबर २०२५) विनातिकीट, वैध तिकीट नसताना प्रवास करणाऱ्या प्रवाशांवर केलेल्या कारवाईची विभागनिहाय माहिती व त्यांच्याकडून वसूल करण्यात आलेल्या दंडाची रक्कम पाहील्यास यामध्ये भुसावळ विभाग : ६.९४ लाख प्रकरणांतून ५९.२५ कोटी रुपये, मुंबई विभाग : ११.३४ लाख प्रकरणांतून ४८.७९ कोटी रुपये, पुणे विभाग : ३.०५ लाख प्रकरणांतून १८.४० कोटी रुपये, नागपूर विभाग : २.९२ लाख प्रकरणांतून १८.१३ कोटी रुपये,सोलापूर विभाग : १.६० लाख प्रकरणांतून ७.५० कोटी रुपये आणि मुख्यालय : १.६६ लाख प्रकरणांतून १२.८२ कोटी रुपये वसूल करण्यात आले आहेत.

मध्य रेल्वेने अनधिकृत प्रवास ओळखण्यासाठी बहुसूत्री धोरण अवलंबले असून त्यामध्ये स्थानक तपासणी, अचानक तपासणी, किल्ला पद्धतीची (फोर्ट्रेस) तपासणी, सखोल तपासणी तसेच मेगा तिकीट तपासणी मोहिमांचा समावेश आहे. या कारवाया मेल, एक्स्प्रेस गाड्या, प्रवासी गाड्या, विशेष गाड्या तसेच मुंबई व पुणे विभागांतील उपनगरीय गाड्यांमध्ये राबविण्यात येतात.

## जिंदल विद्यालयाकडून आश्रमात जीवनोपयोगी वस्तूंचे वाटप

**मुरुड : प्रतिनिधी**

जिंदल विद्या मंदिर, साळाव या शाळेने आपल्या सामाजिक सेवा जबाबदारी या उपक्रम अंतर्गत अनाथाश्रमासाठी अर्थपूर्ण सामाजिक उपक्रम राबवून संवेदनशीलता, करुणा व सामाजिक बांधिलकीचे उत्तम उदाहरण समाजासमोर ठेवले आहे.



या उपक्रमांतर्गत एसएसआर विभागाच्या प्रभारी स्वाती पाटील व एलिझाबेथ झिना यांनी शाळेच्या १० विद्यार्थ्यांसह कोर्लईस्थित शांतिवन आश्रम येथे भेट दिली. या भेटीदरम्यान आश्रमातील मुलांसाठी खाण्याचे पदार्थ, किराणा सामान तसेच दैनंदिन उपयोगाच्या आवश्यक वस्तूंचे वितरण करण्यात आले. या मदतीमुळे आश्रमातील मुलांच्या दैनंदिन गरजा काही प्रमाणात सुलभ होऊन त्यांच्या जीवनात आनंद व दिलासा निर्माण झाला.

हा उपक्रम विद्यार्थ्यांसाठी एक महत्त्वाचा जीवनोपयोगी अनुभव ठरला. समाजातील वास्तव परिस्थितीची जाणीव होऊन दयाळूपणा, वाटून घेण्याची भावना तसेच वंचितांप्रती कर्तव्यभावना विद्यार्थ्यांमध्ये दृढ झाली.

या उपक्रमाला शाळेचे प्राचार्य मुकेश ठाकूर यांचे मार्गदर्शन व प्रेरणा लाभली. त्यांच्या प्रोत्साहनामुळेच शाळेत अशा मूल्याधिष्ठित उपक्रमांना सातत्याने चालना मिळत आहे. तसेच शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष पंकज मलिक यांनी शाळा, शिक्षकवृंद व विद्यार्थ्यांच्या या स्तुत्य उपक्रमाचे कौतुक करून सामाजिक कल्याणासाठीच्या त्यांच्या योगदानाबद्दल विशेष अभिनंदन केले.

## राष्ट्रीय पुरस्कार विजेत्या पार्श्वगायिका अंजली मराठेंचा आज अलिबागेत कार्यक्रम

**अलिबाग : प्रतिनिधी**

चित्रपट पार्श्वगायनासाठी राष्ट्रीय पुरस्कार मिळविलेल्या प्रख्यात गायिका अंजली मराठे अलिबागमध्ये मैफिल संस्थेतर्फे आयोजित कार्यक्रमात आठवणीतली रसिकप्रिय गाणी सादर करणार आहेत. शनिवार, २० डिसेंबर रोजी सायंकाळी ६ वाजता येथील आरसीएफच्या कुरूळ वसाहतीतील सभागृहात या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

मैफिल अलिबाग या संस्थेतर्फे गेली पस्तीस वर्षे सातत्याने दर्जेदार सांगितिक कार्यक्रमांचे आयोजन केले जात आहे. या कालावधीत अनेक राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय ख्यातकीर्त कलाकारांच्या गायन-वादनाचा अभूतपूर्व सांगीतिक अनुभव अलिबाग परिसरातील संगीत रसिकांनी घेतला आहे. सन २०२५मध्ये 'मैफिल'तर्फे संगीत महोत्सवासह सत्यजित प्रभू यांचा जादूची पेटी व आषाढीनिमित्त भक्तिसंगीताचे कार्यक्रम झालेले आहेत.

येत्या शनिवारी आयोजित 'गाणी मनातली' या कार्यक्रमाच्या निमित्ताने सरत्या वर्षात एका अतिरिक्त सांगीतिक अनुभवाची रसिकांना भेट मिळणार आहे. या कार्यक्रमात सुविख्यात अंजली मराठे यांच्यासमवेत राम देशपांडे हे रसिकप्रिय हिंदी मराठी गाणी सादर करणार आहेत. सीओइपी कॉलेजचे अभियांत्रिकी पदवीधर राम देशपांडे पूर्वीपासून संगीत क्षेत्रात देखील कार्यरत आहेत. पं. श्रीकांत ढोकरीकर व पं.गंगाधरबुवा पिंपळखरे यांच्यासारख्या गुरूंकडून त्यांनी संगीताची दीक्षा घेतलेली आहे. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या शिक्षणाच्या मदतीसाठी इन्फिनिटी या ब्रँडखाली ते व अंजली मराठे 'सैगल ते अरिजित सिंग,' 'मौसमे गझल', 'तलत मेहमूद स्पेशल' यांसारखे कार्यक्रम करत असतात. मैफिल अलिबागसाठी त्यांनी गाणी मनातली हा खास कार्यक्रम इन्फिनिटी ब्रँडखाली डिझाइन केला आहे.

या कार्यक्रमात त्यांना साथ संगत करण्यासाठी केदार परांजपे, सुहास काटदरे, विक्रम भट, वासुदेव बापट असे समर्थ कलाकार आहेत. कार्यक्रमाचे निवेदन सचिन सामंत करणार आहेत. हा कार्यक्रम २० डिसेंबर रोजी सायंकाळी ६.३० वाजता आरसीएफ सभागृह,आरसीएफ वसाहत, कुरुळ येथे होणार असून तो विनामूल्य आहे.



**मुरुड : येथील खोरा बंदरात विविध शाळांच्या सहली जंजिरा किल्ला पाहण्यासाठी मोठ्या प्रमाणात येत आहेत. खोरा बंदराला प्रत्येक दिवशी सुमारे २५ बस भेट देत आहेत. त्यामुळे पर्यटकांची गर्दी पहायला मिळत आहे.** (छाया : सुधीर नाझरे)

# नवा गडी, नवे राज्य!

## झारखंडने पहिल्यांदाच जिंकली सय्यद मुश्ताक अली ट्रॉफी

**पुणे : प्रतिनिधी**

झारखंडच्या संघाने पुण्याच्या मैदानात रंगलेल्या सय्यद मुश्ताक अली ट्रॉफी स्पर्धेतील फायनलमध्ये हरयाणाला पराभूत करत इतिहास रचला आहे. फायनल लढतीत पहिल्यांदा फलंदाजी करताना कर्णधार ईशान किशन आणि कुमार कुशाग्रच्या धमाकेदार खेळीच्या जोरावर झारखंडच्या संघाने निर्धारित २० षटकात ३ बाद २६२ धावा केल्या होत्या. विक्रमी धावसंख्येचा पाठलाग करण हरयाणाच्या संघाला जमलं नाही.



फलंदाजीतील धमाकेदार कामगिरीनंतर गोलंदाजीतील धार दाखवून अखेर झारखंडच्या संघाने पहिल्यांदा सय्यद मुश्ताक अली ट्रॉफी स्पर्धा जिंकली आहे. झारखंड हा ही स्पर्धा जिंकणारा १२वा संघ ठरला आहे.

झारखंडकडून कर्णधार ईशान किशन याने ४९ चेंडूत १०१ धावांची सर्वोच्च खेळी केली. याशिवाय कुमार कुशाग्रच्या भात्यातून ३८ चेंडूत ८१ धावांची धमाकेदार खेळी पहायला मिळाली. या दोघांच्या तुफान फटकेबाजीनंतर अनुकूल रॉय ४० (२०) आणि रॉबिन मिंझ ३१ (१४) यांनीही २००पेक्षा अधिकच्या स्ट्राइक रेटने धावा करत संघाच्या फलकावर ३ बाद २६२ धावा लावल्या. हरयाणाकडून अंशुल कंबोज, सुमित कुमार आणि समंत जखर यांनी प्रत्येकी एक विकेट घेतली, पण सर्वांची झारखंडच्या फलंदाजांनी धुलाई केली.



विक्रमी धावसंख्येचा पाठलाग करताना स्पर्धेत धमाकेदार कामगिरी करणारा हरयाणाचा कर्णधार अंकित कुमार पहिल्याच चेंडूवर बाद झाला. त्याची जागा घेण्यासाठी आलेल्या आशिष सिवाच यालाही विकास सिंह याने खाते उघडू दिले नाही. पहिल्याच षटकात दोन विकेट गमावल्यामुळे हरयाणा संघ बॅकफूटवर गेला. यशवर्धन दलाल याने २२ चेंडूत केलेल्या ५३ धावांसह निशांत संधू ३१ (१५) आणि समंत जाखर ३८ (१७) यांच्याशिवाय अन्य कुणालाही मैदानात तग धरता आला नाही. परिणामी हरयाणाचा डाव १८.३ षटकात १९३ धावांवर आटोपला.

झारखंडच्या संघाकडून बालकृष्ण, सुशांत शर्मा यांनी प्रत्येकी तीन विकेट्स घेतल्या. याशिवाय अनुकूल रॉय आणि विकस सिंह यांनी प्रत्येकी दोन विकेट्स घेत संघाला पहिले जेतेपद मिळवून देण्यात मोलाचा वाटा उचलला.

# दृष्टिबाधित टी-२० वर्ल्डकप विजेत्या महिला खेळाडूंचा गौरव

**मुंबई : प्रतिनिधी**

भारताच्या दृष्टिबाधित महिला टी-२० क्रिकेट संघाने जागतिक पातळीवर ऐतिहासिक कामगिरी करत अजिंक्यपद पटकाविल्याबद्दल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी टीममधील खेळाडूंचा सत्कार केला. महिला खेळाडूंना त्यांच्या सरावात येणाऱ्या अडचणी दूर करण्यासाठी व त्यांना आर्थिक सहाय्य, रोजगाराच्या संधी आणि आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी राज्य शासन सर्वतोपरी मदत करेल, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.

मुख्यमंत्री यांच्या वर्षा शासकीय निवासस्थानी झालेल्या या कार्यक्रमात विश्वविजेत्या संघातील खेळांडूचा सत्कार करण्यात आला. यावेळी क्रीडा व युवक कल्याण आयुक्त शीतल तेली उगले, संघाच्या कर्णधार दीपिका टी.सी., उपकर्णधार व महाराष्ट्राची खेळाडू गंगा कदम, क्रिकेट असोसिएशन फॉर द ब्लाईंड इन इंडियाचे चेअरमन के. जी. महंतेश, क्रीडा विभागाचे उपसचिव सुनील पांढरे, जिल्हा क्रीडा अधिकारी सुवर्णा बारटक्के यांच्यासह संघातील खेळाडू उपस्थित होते.

या खेळाडूंनी भारताचे नाव जागतिक पातळीवर उज्ज्वल केले असून तिरंग्याचा सन्मान वाढवला आहे, असे गौरवोद्गार काढून मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, संपूर्ण स्पर्धेत भारतीय संघ अपराजित राहिला. अंतिम सामन्यात निर्णायक विजय मिळवत भारतीय मुलींनी दृष्टिबाधित क्रिकेटमधील आपले वर्चस्व सिद्ध केले. या विजयामुळे देशभर आनंदाचे वातावरण असून इतिहासात दृष्टिबाधित महिला टी-२० क्रिकेटचे पहिले चॅम्पियन म्हणून भारताचे नाव कोरले गेले आहे.



# राष्ट्रीय तायक्वॉन्डो स्पर्धेत रायगडला चार पदके



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

हैदराबाद येथील बालयोगी इनडोअर स्टेडियममध्ये झालेल्या राष्ट्रीय तायक्वॉन्डो स्पर्धेत रायगड जिल्ह्यातील खेळाडू प्राजक्ता अंकोलेकर, सेजल कानेकर, अनन्या चितळे आणि गायत्री भंडारे यांनी आपल्या खेळाचे प्रदर्शन करून कांस्यपदके पटकावली.

या खेळाडूंना प्रमुख प्रशिक्षक आंतरराष्ट्रीय पंच सुभाष पाटील यांनी मार्गदर्शन केले. गेली २० वर्षे ते पाटील यांच्याकडे प्रशिक्षण घेत आहेत. यशस्वी खेळाडूंचे तायक्वॉन्डो असोसिएशन ऑफ महाराष्ट्र व रायगड तायक्वॉन्डो असोसिएशनचे पदाधिकारी तसेच इतर मान्यवरांनी अभिनंदन केले.

## सिडको ओपन २०२५ गोल्फ स्पर्धा

# गुरूग्रामचा गोल्फपटू वीर अहलावतने पटकाविले विजेतेपद

**नवी मुंबई : सिडको वृत्त**

गुरूग्राम येथील गोल्फपटू वीर अहलावत याने नवी मुंबईतील खारघर व्हॅली गोल्फ कोर्स येथे प्रथमच आयोजित करण्यात आलेल्या लार्सन अ‍ॅण्ड टुब्रो प्रस्तुत सिडको ओपन २०२५ गोल्फ स्पर्धेचे विजेतेपद पटकावले.

बक्षीस वितरण समारंभात सिडकोचे उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक विजय सिंघल तसेच प्रोफेशनल गोल्फ टूर ऑफ इंडिया (पीटीजीआय)चे अध्यक्ष कपिल देव यांच्या हस्ते विजेते वीर अहलावतला चषक प्रदान करण्यात आला. या वेळी सिडकोचे सहव्यवस्थापकीय संचालक शान्तनु गोयल, लार्सन अ‍ॅण्ड टुब्रोचे वरिष्ठ उपाध्यक्ष व विशेष कार्यप्रमुख श्रीनाथ राव तसेच पीटीजीआयचे मुख्य कार्यकारी अधिकारी अमनदीप जोहल उपस्थित होते.



वीर अहलावत याने अंतिम फेरीत चार-अंडर ६७ अशी कामगिरी करत एकूण १४-अंडर २७० गुणांसह तीन स्ट्रोक्सच्या फरकाने स्पर्धेत विजय मिळवला. स्पर्धेच्या पहिल्या तीन फेऱ्यांमध्ये तो लीडरबोर्डवर आघाडीवर होता. त्याने २०२५मधील हा दुसरा, तर एकूण सहावा व्यावसायिक विजेतेपदाचा मान पटकावला तसेच २०२५ पीटीजीआय क्रमवारीत १८व्या स्थानावरून ११व्या स्थानावर झेप घेतली.

पुण्याचा गोल्फपटू रोहन ढोले पाटील याने एकूण ११-अंडर २७३ गुणांसह उपविजेतेपद मिळवले. पीटीजीआयवरील ही त्याची सर्वोत्तम कामगिरी ठरली आहे. या निकालामुळे त्याच्या क्रमवारीत ४२व्या स्थानावरून ३२व्या स्थानावर सुधारणा झाली.

गुरुग्रामचा मनु गंडास आणि इटलीचा मिशेल ऑर्टोलानी यांनी प्रत्येकी १०-अंडर २७४ गुणांसह संयुक्त तिसरे स्थान पटकावले. चंदीगडचा रवी कुमारने अंतिम फेरीत १३व्या होलवर होल-इन-वन साधत स्पर्धेतील तिसरा होल-इन-वन नोंदवला. त्याने एकूण चार-अंडर २८० गुणांसह संयुक्त नववे स्थान मिळवले.

# राष्ट्रीय व्हॉलीबॉल स्पर्धेसाठी लक्ष्मी माळीची निवड

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

रसायनी येथील पिल्लई एचओसी कॉलेजमध्ये इयत्ता अकरावी कॉमर्समध्ये शिक्षण घेत असलेली सावळे गावची लक्ष्मी प्रशांत माळी हिची राष्ट्रीय व्हॉलीबॉल स्पर्धेसाठी निवड झाली आहे.

४९वी ज्युनियर राष्ट्रीय व्हॉलीबॉल स्पर्धा राजस्थानमध्ये होत असून पिल्लई कॉलेजतर्फे रायगड जिल्ह्यातून महाराष्ट्र राज्याच्या संघात व्हॉलीबॉल स्पर्धेसाठी खेळण्याचा मान लक्ष्मी माळीला मिळाला आहे. त्याबद्दल तिचे कौतुक होत



असून पुढील वाटचालीसाठी मान्यवरांनी तिला शुभेच्छा दिल्या तसेच यशस्वी होण्यासाठी आशीर्वाद दिले.

# ईशान किशनची विक्रमी सेंच्युरी

## सर्वाधिक षटकारांचाही सेट केला नवा रेकॉर्ड

**पुणे : प्रतिनिधी**

पुण्यातील महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशनच्या मैदानात रंगलेल्या सय्यद मुश्ताक अली ट्रॉफी स्पर्धेतील अंतिम सामन्यात झारखंडचा कर्णधार ईशान किशन याने वादळी शतकासह अनेक विक्रम प्रस्थापित केले. २४व्या चेंडूवर चौकार मारून अर्धशतकाला गवसणी घालणाऱ्या ईशानने ४५ चेंडूत षटकारासह शतक साजरे केले. शतकी खेळीनंतर त्याने पुष्पा स्टाइलमध्ये सेलिब्रेशनही केल्याचे पहायला मिळाले.

सय्यद मुश्ताक अली ट्रॉफी स्पर्धेच्या फायनलमध्ये शतक झळकवणारा तो दुसरा फलंदाज



ठरला. याआधी पंजाबच्या संघाकडून अनमोलप्रीत सिंग याने फायनलमध्ये शतकी खेळी साकारली होती. ईशान किशन याने फायनलमध्ये धमाकेदार खेळीचा नजराणा पेश करताना चार चौकार आणि १० षटकारांच्या मदतीने २०६.१२च्या स्ट्राइक रेटसह १०१ धावा केल्या.

ईशान किशन याने फायनलमधील शतकी खेळीसह सय्यद मुश्ताक अली ट्रॉफी स्पर्धेत सर्वाधिक शतके झळकवणाऱ्या फलंदाजांच्या यादीत अव्वल असलेल्या अभिषेक शर्माची बरोबरी साधली आहे. आयपीएलमध्ये सनरायझर्स हैदराबादच्या ताफ्यातून खेळणारी ही जोडी देशांतर्गत टी-२० स्पर्धेत प्रत्येकी ५-५ शतकासह संयुक्तरित्या अव्वलस्थानी आहे.

ईशान किशन याने आपल्या शतकी खेळीत १० उत्तुंग षटकार मारल्याचे पहायला मिळाले. सय्यद मुश्ताक अली ट्रॉफी स्पर्धेत सर्वाधिक षटकार मारणाऱ्या फलंदाजांच्या यादीत तो आता अव्वलस्थानी पोहचला आहे. आतापर्यंत त्याने या स्पर्धेत ३३ षटकार मारले आहेत. ईशानने पंजाबच्या सलील अरोराला मागे टाकले. त्याने आतापर्यंत २८ षटकार मारल्याचा रेकॉर्ड होता.

**आयपीएल २०२६**

# जोस इंग्लिश सुरुवातीच्या सामन्यांना मुकणार

**मुंबई :** आयपीएल २०२६च्या मिनी ऑक्शनचा धडाका संपला असला तरी चर्चा मात्र अजूनही सुरूच



आहे. लखनऊ सुपर जायंट्स संघाने ज्या ऑस्ट्रेलियन स्फोटक फलंदाजासाठी ८.६ कोटी रुपये मोजले, तो जोस इंग्लिश आता आगामी हंगामातील सुरुवातीच्या सामन्यांना मुकणार आहे.

लिलावात जोस इंग्लिशला खरेदी करण्यासाठी सनरायझर्स हैदराबाद आणि लखनऊ सुपर जायंट्स यांच्यात जबरदस्त 'बिडिंग वॉर' पहायला मिळाले. अखेर ८.६ कोटींची मोठी रक्कम मोजून लखनऊने बाजी मारली, पण ही आनंदाची बातमी फार काळ टिकली नाही. जोस इंग्लिशने स्वतः स्पष्ट केले आहे की, तो आयपीएल २०२६च्या पूर्ण हंगामासाठी उपलब्ध नसेल.

# गौतम गंभीर कोच नव्हे मॅनेजर!

## कपिल देव यांनी संदर्भासह दिले स्पष्टीकरण



**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

भारतीय संघाचे माजी कर्णधार आणि जगातील सर्वोत्तम अष्टपैलूपैकी एक अशी ओळख असलेल्या कपिल देव यांनी आधुनिक जमान्यातील क्रिकेटमधील प्रशिक्षणाच्या मुद्यावर भाष्य करताना गौतम गंभीरला मॅनेजरचा टॅग लावला आहे. गंभीरला प्रशिक्षक नव्हे तर संघ व्यवस्थापक म्हणावे, अशा आशयाचे वक्तव्य त्यांनी केले आहे.

इंडियन चेंबर ऑफ कॉमर्सच्या हस्ते आयोजित आयसीसी शताब्दी सत्रातील खास कार्यक्रमात कपिल देव म्हणाले की, आंतरराष्ट्रीय स्तरावर खेळाडूंना आता पारंपरिक प्रशिक्षणाची गरज उरलेली नाही. सध्याच्या घडीला 'कोच' हा शब्द फारच सर्वसाधारण झाला आहे. गौतम गंभीर कोच असू शकत नाही; तो संघाचा व्यवस्थापक असू शकतो.

कपिल देव पुढे म्हणाले की, शाळा-कॉलेजमध्ये ज्यांच्याकडून आपण शिकतो ते खरे प्रशिक्षक असतात. ते आपल्याला घडवतात. आंतरराष्ट्रीय पातळीवर मात्र व्यवस्थापन महत्त्वाचे ठरते. इथं प्रशिक्षकाची भूमिकाच नसते. आपले हे विधान भक्कम करण्यासाठी त्यांनी गौतम गंभीर अत्यंत तज्ज्ञ खेळाडूंना अर्थात फिरकीपटू आणि लेग स्पिनरला कोचिंग देऊ शकेल का? असा प्रश्नही उपस्थित केला.

# टी-२० वर्ल्डकपसाठी होणार भारतीय क्रिकेट संघाची घोषणा

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या मालिकेनंतर जानेवारी महिन्यात भारतीय संघ मायदेशात न्यूझीलंडचा सामना करणार आहे. ही आगामी टी-२० वर्ल्डकप २०२६ स्पर्धेआधी होणारी शेवटची मालिका असणार आहे. आयसीसीच्या स्पर्धेसाठी कुठल्याही संघाकडून एका महिन्याआधी संघाची घोषणा केली जाते, पण बीसीसीआय दोन महिन्यांआधीच या स्पर्धेसाठी संघाची घोषणा करणार आहे.

बीसीसीआय न्यूझीलंडविरुद्ध होणाऱ्या वनडे आणि टी-२० मालिकेसाठी भारतीय संघाची घोषणा करणार आहे. यादरम्यान आगामी टी-२० वर्ल्डकप स्पर्धेसाठी भारतीय संघाची घोषणादेखील




केली जाणार आहे. शनिवारी (२० डिसेंबर) मुंबईतील बीसीसीआयच्या हेड क्वार्टरमध्ये बैठक होणार आहे. या बैठकीत न्यूझीलंडविरूद्धच्या टी-२० आणि वनडे मालिकेसह टी-२० वर्ल्डकप स्पर्धेसाठी भारतीय संघाची घोषणा केली जाणार आहे.

संघाची घोषणा झाल्यानंतर दुपारी १.३० वाजता पत्रकार परिषद होणार आहे. या वेळी मुख्य निवडकर्ता अजित आगरकर आणि कर्णधार सूर्यकुमार यादव माहिती देतील.

**कुणाला मिळणार संधी?**

सध्या दुखापतग्रस्त शुबमन गिल बाहेर झाला, तर त्याची जागा घेण्यासाठी संजू सॅमसन आणि यशस्वी जैस्वाल रांगेत आहेत. दुसरीकडे देशांतर्गत क्रिकेटमध्ये दमदार कामगिरी करणाऱ्या मोहम्मद शमीला पुनरागमन करण्याची संधी दिली जाणार का हे पाहणेदेखील महत्त्वाचे ठरणार आहे. भारतीय संघात सध्या हर्षित राणा, अर्शदीप सिंग, प्रसिध कृष्णा आणि जसप्रीत बुमराहसारखे वेगवान गोलंदाज आहेत, तर मोहम्मद सिराजदेखील आपल्या संधीच्या प्रतीक्षेत आहे.

# ट्रॅव्हिस हेडने टाकले रोहित शर्माला मागे

**ओव्हल : वृत्तसंस्था**

अशेस मालिकेतील तिसऱ्या कसोटी सामन्यात ऑस्ट्रेलियाकडून ट्रॅव्हिस हेडने दमदार शतकी खेळी केली. यासह त्याने वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिपमध्ये सर्वाधिक शतके झळकावण्याच्या कामगिरीत रोहित शर्माला मागे टाकले आहे.

हेडने १४६ चेंडूंचा सामना करत शतक झळकावले. हे त्याच्या कसोटी कारकिर्दीतील ११वे, तर वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिप स्पर्धेतील १० वे शतक ठरले आहे. भारताचा माजी कर्णधार रोहित शर्माने वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिपमध्ये नऊ शतके झळकावली होती. इंग्लंडविरुद्ध खेळताना हेडने या स्पर्धेतील दहावे शतक झळकावून

## 'डब्ल्यूटीसी'मध्ये दहावे शतक झळकावले

रोहितला मागे टाकले. यासह तो वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिपमध्ये सर्वाधिक शतके झळकावणाऱ्या फलंदाजांच्या यादीत संयुक्तरित्या चौथ्या स्थानी पोहचला आहे.

'डब्ल्यूटीसी'मध्ये सर्वाधिक शतके झळविण्याची कामगिरी जो रूटने (२२ शतके) केली असून त्यानंतर स्टीव्ह स्मिथचा (१३ शतके) नंबर लागतो. त्या खालोखाल केन विलियम्सन आणि मार्नस लॅबुशेन (प्रत्येकी ११ शतके) तिसऱ्या क्रमांकावर आहेत. भारताचा कर्णधार शुबमन गिलच्या नावे १० शतके आहेत.

दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **–मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अ‍ॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com